# श्री साईलीला



कि. ५० पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

आपण नेहमीं चांगली इच्छा बाळगावी. कोणाचेंही वाईट चिंतू नये. मनांत नेहमीं सद्विचार घोळत रहावे. मग पहा काय चमत्कार घडतो! जशी इच्छा तसें फळ: इच्छेप्रमाणें आपल्या हातून कृतीही घडावी. नाहीं तर बोलायचें एक आणि हातून घडत असावें वेगळेंच! वृत्ति, कृती, एकजीव, एकरूप झाल्या पाहिजेत; म्हणजे साईबाबा तुमच्या मनीचें कोड पुरविल्याशिवाय रहाणार नाहींत. श्रद्धा मात्र बळकट असली पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] जुलै १९६६ [ अंक ४ था

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४२२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

**मनुष्य आशेवर जगत असतो. कोणीही कोणत्याही परिस्थितींत निराशेला न कवटाळतां स्वतःच्या व इतरेजनांच्या सुखासाठीं व दुःख निवारणासाठीं जें करतां येईल तें झटून केलें पाहिजे. आमच्या जीवनांत धार्मिकता आली पाहिजे. धर्मानें व न्यायनीतीनें स्वतः वागून इतरांपुढें तोच आदर्श ठेविला पाहिजे.**

हें जग अन्याय व असमता ह्यांनीं भरलेले आहे. जिकडे पहावें तिकडे असत्याचा विजय होत असलेला दृष्टीस पडतो. 'बळी तो कान पिळी' ह्याचा पदोपदीं अनुभव येत असतो. ही स्थिति पालटून सत्य, न्याय, प्रेम इत्यादि दैवी गुणांची वृद्धि व्हावी ह्यासाठीं, अनेक धर्मसंस्थापकांनीं, साधुसंतांनी व मुत्सद्यांनीं आपलें जीवित खर्ची घातलें असूनहि तींत फारसा फरक पडलेला दिसत नाहीं. असा अनुभव आला म्हणजे मनुष्याच्या तोंडून सहाजिकपणेंच "हें असें चालायचेंच" असे उद्गार निघतात. मनुष्याच्या मनावर निराशावादाचा पूर्ण पगडा बसतो. पण जगांत सर्वांत मोठा अधर्म जर कोणता असेल तर ह्या जगाची सुधारणा करणें व अन्यायाची व असमतेची जागा न्याय व समता ह्यांनीं भरून काढणें शक्य नाहीं, अशी मनुष्याच्या मनाची भावना होणें हा होय. जगामध्यें दिसून येणारीं दुसरीं अधार्मिक कृत्यें ह्या निराशावादापुढें तुच्छ आहेत. सर्वच मनुष्यें हताश होऊन निराशावादाच्या भाराखालीं दडपलीं म्हणजे जगाचे दिवस भरले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत असे अनेक प्रसंग येतात कीं त्याला जगामध्यें बहुजन समाजाला भोंवत असलेला दारिद्र्याचा प्रभाव पहाणें भाग पडतें. दुष्काळासारखे हृदयभेदी प्रसंग पाहून त्याच्या मनाला धक्का बसतो; अनीतीचें साम्राज्य पसरलेलें पाहून त्याचें मन कष्टी व उदास होतें, धर्माच्या नांवावर जगांत चालू असलेले अनेक क्रूर प्रकार, युद्धें व मारामाऱ्या पाहून देव व धर्म सर्व झूट आहे, अशी भावना त्याच्या ठिकाणीं उदय पावते. अशा सर्व प्रसंगीं आपण ह्या परिस्थितीशीं सामना कसा करणार ह्याची दिशा प्रत्येक मनुष्यानें ठरविली पाहिजे. माझ्या हातून काय

होणार आहे, माझी शक्ति ती काय, अशी भ्याडाची भाषा बोलून निराशावादाचें स्तोम माजविणें मानवी जीवनाचा शुद्ध उपमर्द करणें होय.


जगाच्या वर वर्णिलेल्या दुःखद परिस्थितींत फरक घडवून आणण्याचे दोन मार्ग आहेत. आपल्या ठिकाणीं असलेल्या शक्तींचा व आपल्या हातीं असलेल्या साधनांचा. ही परिस्थिति बदलून तिच्या ठिकाणीं सुस्थिति स्थापनेचा उपाय योजणें हा एक. दुसरा मार्ग म्हणजे ज्या ज्या दैवी सामर्थ्यानें सर्व दुःखांचें व अन्यायांचें परिमार्जन केलें जातें, ज्यामुळें असमता, असत्य व अनीति नष्ट होतात तें प्राप्त करून घेणें हा होय.

सत्य आणि असत्य, न्याय आणि अन्याय, शुभ आणि अशुभ, मंगल आणि अमंगल, शुद्ध आणि अशुद्ध, प्रेम आणि द्वेष हीं जोंपर्यंत परस्परभिन्न आहेत व एकाच्या ठिकाणीं दुसऱ्याची स्थापना होणें अवश्य आहे तोंपर्यंत मनुष्याला धर्माची आवश्यकता आहे. धर्माचें कार्य वाईटाचा नायनाट करून त्या ठिकाणीं शुभाची स्थापना करणें हें होय. ह्यासाठीं ज्याला ज्याला आपली व इतरांची सुधारणा होऊन सर्वांना सुख व शांति प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल, त्यानें धर्माची कांस धरली पाहिजे.

आज सर्वत्र धर्माची अनास्था चालू असलेली दृष्टीस पडते. मनुष्याच्या आर्थिक उन्नतीवर सर्व कांहीं अवलंबून आहे असें पुष्कळांना वाटावयास लागलें आहे. अर्थोत्पादनानें धर्माची व देवाची जागा घेतली पाहिजे असें आपणाला धार्मिक म्हणविणारे पुष्कळ लोक प्रतिपादन करूं लागले आहेत. मानवी जीवन पुरेसें खाण्यापिण्याला मिळून सुखावह झालें, मनुष्याच्या सर्व ऐहिक गरजा भागल्या व त्याला बरीचशी फुरसत मिळूं लागली म्हणजे देवाविषयीं व धर्माविषयीं विचार करणें त्याला शक्य होईल व अशी स्थिति प्राप्त होत नाहीं तोंपर्यंत, हरिस्मरण होणें शक्य नाहीं, अशी पुष्कळांची विचारसरणी बनलेली पहावयास सांपडते. दारिद्र्य ईशचिंतनाच्या आड येतें असा त्यांचा पूर्ण ग्रह बनलेला दिसतो. पण ही विचारसरणी व हा ग्रह चुकीचा आहे हें कोणाही विचारी माणसास सहज समजण्यासारखें आहे. मनुष्य केवळ खाण्यापिण्यानेंच जगत नाहीं हें ख्रिस्ताचें वाक्य उच्चारणें म्हणजे ढोंगीपणाची सीमा होय. असें प्रतिपादन करणाऱ्यांना ख्रिस्ताच्या शिकवणीचा अर्थच समजला नाहीं असेंच म्हणावें लागेल. मनुष्याचें खरें जीवन म्हणजे परमेश्वराच्या आदेशाप्रमाणें वर्तणें हें होय. तसें वागणें म्हणजे जगावर सत्य, न्याय, नीति, प्रेम, इत्यादि गुणांचें स्वतःच्या आचरणानें राज्य पसरविणें होय. हरएक मनुष्यानें देवानें आपल्या ठिकाणीं ठेवलेल्या प्रचंड सामर्थ्याचा सत्कार्यीं उपयोग केला असतां जगांतील अन्याय, दारिद्र्य व असमता नाहींशी होऊन एकंदर मानवी जीवन धार्मिक व पवित्र होईल. राष्ट्राराष्ट्रांत,

देशादेशांत व जातीजातींत भडकून राहिलेला कलहाग्नि विझेल व बंधुत्त्वाची व प्रेमाची वाढ होऊन ज्या सुस्थितीला स्वर्गीय राज्य म्हणण्याची चाल पडली आहे, त्या राज्याची पृथ्वीवर स्थापना होईल. ह्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें आपल्यावर निराशेचा पगडा केव्हांही बसूं देतां कामा नये. सभोंवार दिसून येणाऱ्या दुःस्थितीनें गांगरून जाऊन "वर्गयुद्ध" हाच एक समतास्थापनेचा मार्ग आहे, असा समाजघातक ग्रह करून घेतां कामा नये. धर्मांच्या शाश्वत तत्त्वांवर दृढ विश्वास ठेवून आपल्या व जगाच्या उन्नतीला धर्मच उपयोगी पडेल ही भावना दृढतर करून त्या दिशेनें उन्नतीचा मार्ग आक्रमिला पाहिजे.

—संपादक



## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह (स्टँप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# श्रद्धा, सेवा व सामर्थ्य

लेखक : बा. भा मगदूम

' श्रद्धा, प्रारंभीं व्यक्तिगत स्वरुपाची असते. नंतर ती विश्वात्मक स्वरुपाची होते. म्हणूनच ज्ञानेश्वरांनीं ' अगा विश्वात्मकें देवें ।' असें संबोधिलें आहे. श्रद्धेचें हें परिणित स्वरूप आल्हादकारक व सर्वंकश असतें. त्यामुळें भूतमात्रीं भगवान पहाण्याची दृष्टी भक्ताला लाभते. प्राथमिक व्यक्तिगत स्वरुपाची श्रद्धा ही थोडीशी अहंकारी असते. अहंकारी श्रद्धेनें साधना अपूर्ण बनते; यासाठीं ' श्रद्धा, विश्वव्यापक असावी अशी बाबांची इच्छा होती. व व्यापक श्रद्धेला पवित्र व प्रखर ज्ञानदृष्टीची जोड हवी असा बाबांचा आग्रह होता.' श्वानश्रद्धा व मानवश्रद्धा, यांतील फरक बाबांनीं भक्तांना स्पष्टरीत्या विषद केला आहे. निष्ठा आत्यंतिक असावी पण आंधळी असू नये असें बाबा सांगत असत. ' कारण ' अंधश्रद्धा, ही अनेकदां स्वार्थी असते. स्वार्थी निष्ठा व परमार्थिक निष्ठा यांचें स्वरूप भिन्न असतें. स्वार्थी निष्ठा संकुचित असते तर पारमार्थिक निष्ठा भव्य व उदात्त असते. या दोन्हींचा योग्य रीतीनें वापर करण्यासाठीं भक्ताला ज्ञानदृष्टीची आवश्यकता आहे. ज्ञानानें प्रपंच व परमार्थ यांतील सावधानता अंगीं बाणली, तरच श्रद्धेचा योग्य वापर करतां येतो. श्रद्धा ही दुधारी तरवार आहे. जशी युद्धासाठीं शस्त्राची तशी साधनेसाठीं श्रद्धेची आवश्यकता असते.

तसेंच सेवेचें स्वरूपहि द्विविध आहे, ' सकाम व निष्काम ' या दोन्ही स्वरूपाची सेवा भक्ताला करावी लागते. उच्च प्रतीची सेवा ही योगासारखी कठीण व दुर्लभ असते. श्रेष्ठ शस्त्रविशारद व सामान्य झाडूवाला यांच्यात मूलतः फरक नसला तरी तांत्रिक फरक असतोच. सेवेची ही लौकिक अभिव्यक्ति ग्राह्य असते. (१) श्रद्धा = सोशल ॲथॉरिटी, (२) सेवा = लीगल ॲथॉरिटी, (३) सामर्थ्य = सुप्रिम ॲथॉरिटी, ही मानवी जीवनाची त्रिविध सूत्रें आहेत. यातूनच (१) लोकनीति, (२) राजनीति व (३) धर्मनीति यांचा उगम होतो. सगुण सेवा लौकिक बंधनानीं व व्यवहारिक इष्टानिष्टानें बद्ध असते तर निर्गुण सेवा ही व्यापक व मोक्षदायी ठरते. श्रेष्ठ जीवनाच्या उपासकाला श्रद्धेइतकीच सेवेचीही जरुरी असते. श्रद्धा व सेवा यांचें बाह्य रुप सर्व-सामान्यालाही कळूं शकतें, पण भक्ताला यांचें आंतरिक स्वरूप जाणून घेणें आवश्यक आहे. त्याशिवाय साधना पूर्णत्वास जात नाहीं. श्रद्धेचें व सेवेचें अंतरंग जितकें

अधिक प्रभावी तितका भक्त सामर्थ्यवान ठरतो. साधकाची ही कठीण परीक्षा असते. येथें आवळ्या–भोपळ्याची मोट बांधणारी वृत्ति कुचकामी ठरते. श्रद्धेची व सेवेची तपःश्चर्या जेवढी अधिक तेवढें सामर्थ्यही वाढत जातें. आधुनिक मनोवैज्ञानिक याला 'सेल्फ कंट्रोलिंग पॉवर' या नांवानें ओळखतात. श्रद्धावान, सेवाशील व समर्थ भक्त असावा अशी बाबांची अपेक्षा होती. या गोष्टी झटपट होत नाहींत म्हणून बाबा 'श्रद्धा व सबूरीचा' कानमंत्र भक्तांना देत. केवळ बुद्धिप्रभावानें व संपत्तीनें ही साधना यशस्वी होत नाहीं. यासाठीं अनन्य भक्ती, भक्ताठायीं असावी लागते. बौद्धिक व शारीरिक सामर्थ्य मानवी प्रयत्नानी लाभू शकते, पण मानसिक सामर्थ्यासाठीं व असाधारण धैर्यासाठीं सद्‌गुरूस शरण जावे लागते. 'सद्‌गुरूवांचूनि सापडेना सोय' हाच एकमेव उपाय आहे.

सामर्थ्याची पूजा म्हणजे अग्निपूजा, ही पूजा सतत चालावी म्हणून बाबांनीं शिर्डीत अखंड धुनी पेटती ठेवली. बाबांची ही द्वारकामाईतील धुनी, आपणास (भक्तास) सामर्थ्याची उपासना करण्याची प्रेरणा अजून देत आहे व यापुढेंहि चिरकाल देईल. समृद्धि, सामर्थ्य व समानता ही द्वारकामाईची शिकवण आहे. आपण स्वतः सामर्थ्यवान व्हावे, व दुसऱ्यांना सुखी करावे हा बाबांच्या सेवामय अवतारकार्याचा प्रधान हेतू होता; तो हेतू अनेक परींनी बाबा भक्तांना समजावून देत. बौद्धिक व शारीरिक सामर्थ्याहून मानसिक व आत्मिक सामर्थ्य श्रेष्ठ आहे. या सामर्थ्याच्या प्राप्तीसाठीं साईबाबांची, अनन्य भक्ती करून त्यांना शरण जावे म्हणजे ही वरप्राप्ति सुलभ होईल. सामान्यांची श्रद्धा व साधकाची श्रद्धा यांतील फरक स्पष्ट होण्यासाठीं अर्जुनासारख्या 'श्रेष्ठ धनुर्धरालाही' मामेकं शरणं व्रजः असा उपदेश केला, याचा अर्थ सद्‌गुरूला शरण जाणें हाच यशस्वी जीवनाचा अंतिम मार्ग होय! यासाठीं 'सर्व धर्मान परित्यज्य' ही अपरिग्रहाची वृत्ति प्रथम अंगीं बाणवली पाहिजे. अन्यथा एक ना धड भाराभर चिंध्या, अशी अवस्था होण्याची भीति असते! मी कोण? हा प्रश्न स्वतःच्या मनाला विचारल्यास मी बाबांचा अनन्य भक्त! असें उत्तर ज्यावेळीं आपणास मिळेल, त्याचवेळीं बाबांची कृपा आपल्या सहाय्यास वाटेल तेथें धावून येईल, याला इतर अन्य कोणत्याही पुराव्याची गरज नाहीं. अन्यथा द्वेष, मोह व मत्सराच्या कांटेरी मार्गावर कितीहि धडपड केली तरी ती व्यर्थच ठरते.


श्रद्धेनें व सेवेनें परमेश्वराला अंकित करतां येतें, पण ती श्रद्धा व सेवा समर्थ व निष्काम असावी लागते. मायावी मनाची अशी भ्रामक समजूत असते कीं, साईबाबा फक्त शिर्डीत आहेत. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी बाबा सर्वत्र आहेत. त्यांना

पाहण्यासाठीं भक्त प्रल्हादाच्या, आत्यंतिक भक्तीची आवश्यकता आहे. तीच उणीव आहे. युगायुगाचें भाग्य अंतरिक तळमळीतूनच भेटत असते, त्यासाठीं बाह्य आराधनेची फारशी आवश्यकता नसते. तुकोबांना व ज्ञानदेवांना भेटलेलें परब्रह्म 'शिर्डीत अवतरलें' या अखिल विश्वात विखुरलेल्या 'पुंडलीकां'साठीं चराचरांत तिष्ठत उभे आहे. त्याला भेटण्यासाठीं गंध, टिळ्यांची अगर पुष्पमाळांची गरज नाहीं. 'भक्तांचिया काजा । द्वारकेचा राजा । उभा सर्वकाळी । साई वनमाळी ॥ १ ॥




## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल्स वर्क्स,** [illegible] जांभळी [illegible]

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# एकनाथ स्वामींची गुरुभक्ति

## शिष्य असावा तर असा !

**एकनाथानें ईश्वर भेटीचा एकमेव ध्यास बालपणापासूनच घेतला होता. ही भेट कोणत्या सत्पुरुषाचे पाय धरले असतां होईल, याचेंच चिंतन तो रात्रंदिवस करीत होता. कोणत्याही गोष्टीचा तुम्हीं ध्यास घेतला म्हणजे तो परमात्मा तुमचें मार्गदर्शन करतो. तुमची श्रद्धा मात्र दृढ पाहिजे. एकनाथ स्वामींना गुरुदर्शन कसें घडलें तें पहा !**

देवाची भेट कोण घडवील, ब्रह्मज्ञानाची चावी कोणामुळें हस्तगत होईल; तसेंच परमार्थ साधण्यासाठीं आपण काय केलें पाहिजे, इत्यादि विचारांचे तरंग त्याच्या अंतःकरणांत निरंतर उठत व त्याविषयीं कांहीं उपाय न सांपडल्यामुळें तो कधींकधीं अत्यंत कष्टी होत असे.

### गंभीर आकाशवाणी

अशा प्रकारच्या विचारांत चूर होऊन एके दिवशीं एका शिवालयाच्या गाभाऱ्यांत तो चिंताग्रस्त बसला असतां, सिंहनादाप्रमाणें अकस्मात् गंभीर आकाशवाणी झाली कीं, " देवगडावर जनार्दनसंत नामें सत्पुरुष, यवन पादशाहाच्या पदरीं आहे, त्यास गुरु कर, म्हणजे इष्टहेतु सिद्धीस जाईल. "

हा अश्रुतपूर्व ध्वनि श्रवण करून एकनाथ खडबडून उठला व ह्या निर्जन प्रदेशीं मनुष्याचा किंवा श्वापदाचा वासही नसून हा प्रचंड ध्वनि कोणीकडून आला, म्हणून शिवालयाच्या आंतबाहेर पहातो तों कोठेंच कोणी दृष्टीस पडेना. तेव्हां हा काय अजब चमत्कार आहे, म्हणून किंचित् विस्मय करतो आहे, इतक्यांत पुराणांतरीं ऐकलेल्या देववाणीचें व आकाशवाणीचें त्यास स्मरण झालें. तेव्हां आपल्या अंतःकरणांतील चिंतारूप तमाचा नाश करणारी ही वाणीरूप विद्युल्लता मेघडंबरांत उज्ज्वलित झाली, हें जाणून एकनाथास अवर्णनीय हर्ष झाला. मग येथील बिल्ववृक्षाच्या ओल्या सालींवर बेलाच्याच कांट्यानें, ऐकलेलीं सर्व अक्षरें स्पष्ट लिहून तीं

त्यांचें पुनः पुनः उच्चारण करूं लागला. कांहीं वेळ गेल्यावर, आज आपल्याला अपूर्व वस्तूची जोड मिळाली, म्हणून मोठ्या आनंदानें नाथ परत घरीं आला.

आकाशवाणीची वार्ता एकनाथानें कोणालाच सांगितली नाहीं. त्या दिवसापासून त्यानें वारंवार त्या शिवालयांत येऊन झाडाखील वाक्याची आवृत्ति करावी, व देवगडास जाण्याचे बेत करावे. आपल्या इष्टमित्रांस विचारून पैठणाहून देवगड किती लांब आहे, जावयाचा रस्ता कोणता, मार्गांत खेडींपाडीं कोणतीं लागतात, वगैरे गोष्टींचें एक लहानसें टिपण करून तें तो निरंतर आपल्याजवळ बाळगी.

## पुराणिकांचें सांगणें

पैठण सोडण्याचा विचार मनांत आला म्हणजे एकनाथास कधीं कधीं अत्यंत वाईट वाटे. चक्रपाणीचें वार्धक्य, त्याची आपण गेलों असतां होणारी दीनवाणी दशा, त्याचें अवर्णनीय प्रेम व अपरिमित ममता, आदिकरून गोष्टी मनांत आल्या म्हणजे एकनाथाचा कंठ दाटून त्यास गहिंवर येई, अंगास कंप सुटे व तो ओकसाबोकशी रडावयास लागे. परंतु विवेकानें लागलाच मनाला आळा घालून त्यानें समाधान करून घ्यावें व जगाची क्षणभंगुरता, ब्रह्मज्ञानापासून होणारा आनंद आणि कर्णरंध्रांत दुमदुमणारा गंभीर ध्वनि ह्यांची आठवण होऊन त्यानें दुःखाश्रूंचें परिमार्जन करावें, करगोटा वर सारावा व देवगडास जाण्याची तयारी करावी.

याप्रमाणें बेत करितां करितां, एके दिवशीं पहांटेच्या सुमारास या वामनमूर्तीनें खरोखरीच कोणास न कळूं देतां, प्रतिष्ठानपुरीहून पोबारा केला. जाण्याचे पूर्वी कांहीं दिवस, घरच्या माणसांस काळजी न लागावी म्हणून एका पुराणिकाजवळ सहज, जाण्याविषयीं एकनाथानें गोष्ट काढली होती. हा पुराणिक फार सज्जन असून एकनाथावर त्याचें फार प्रेम जडलें होतें. त्यानें नाथाचा जाण्याचा बेत ऐकून त्याला पराकाष्ठेचें समाधान वाटलें. ह्या पुराणिकाकडून एकनाथ आपल्या शंकांचें समाधान करून घेत असे. ह्यामुळें ह्या परस्परांचें अत्यंत प्रेम असून पुराणिकाचें हेंच सांगणें असे कीं, "योग्य गुरुमुखाशिवाय ब्रह्मज्ञान प्राप्त होणें नाहीं."

एकनाथ पहांटेस उठला, तो त्यानें देवगडचा थेट रस्ता धरिला. घरचीं माणसें किंवा इष्टमित्र भेटले तर जाण्यास प्रतिबंध करितील, म्हणून शहरांतून एकसारखी धूम ठोकिली, व वेशीबाहेर येऊन कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर त्यानें मार्गक्रमणास सुरवात केली.

## घरास रामराम ठोकला

एकनाथास चालण्याचा कधींच परिपाठ नसे. आधींच अष्टवर्षांची सुकुमार मूर्ति, तशांत तो सर्व भानुदासवंशाचा एक तंतु असल्याकारणानें त्याला

कोठें ठेवूं व कोठें न ठेवूं, असें चक्रपाणीस व त्याच्या सुशील पत्नीस होत असे; तेव्हां त्या बालकास प्रवासाची व चालण्याची सवय कोठून असणार ? ग्रीष्म ऋतूंतील सूर्याचें प्रखर ऊन लागून अंगांतून घामाच्या धारा चालल्या आहेत, उष्णनिवारणार्थ अंगांतील अंगरख्यानें तप्त मस्तक आच्छादित केलें आहे; पायांत कांटे शिरून त्यांतून रक्ताच्या चिळकांड्या उडत आहेत, उन्हाच्या तिरमिरीनें वारंवार तो मूर्च्छित पडत आहे ! अशा रीतीनें अत्यंत हाल सोसून एकनाथानें दिवसभर मार्ग क्रमावा व रात्रीचे सुमारास कोणी परिचित मनुष्य भेटेल या भीतीस्तव गांवांत न शिरतां त्यानें रानांत झाडाखालींच रात्र काढावी.

इकडे एकनाथाच्या घरीं प्रातःकालीं नाथाला जागें करण्याकरितां आजी हांका मारूं लागली, परंतु हाकेसरसा ओ देणारा एकनाथ बऱ्याच हाका मारिल्या तथापि जागा होत नाहीं, हें पाहून चक्रपाणीच्या बायकोस आश्चर्य वाटलें. व एकनाथ बिछान्यावर नाहीं असें पाहून तिच्या पोटांत धस्स झालें. नंतर चक्रपाणीस जागे करून तीं उभयतां घरांत एकनाथाची पुसतपास करूं लागलीं. इतक्यांत पहातात तों दरवाजाला कडी नसून अडसरही ओढलेला नाहीं. तेव्हां एकनाथ खचित कोठेतरी पहांटेचाच बाहेर निघून गेला, अशी सर्वांची खात्री झाली.

शेजारींपाजारीं व आळीमध्ये शोध करण्याकरितां चक्रपाणी व घरचीं सर्व माणसें धांवलीं. जो कोणी भेटे त्याला केविलवाण्या व घाबरलेल्या स्वरानें चक्रपाणीनें विचारावें कीं, " माझ्या नाथास कोणी पाहिलें काय ? एक्या कोणाच्या दृष्टीस पडला काय ? " परंतु ज्यांना एकनाथाच्या प्रयाणाची माहिती नव्हती ते लोक त्याच्याविषयीं काय सांगणार ! !

### एकनाथाचा सर्वत्र शोध

एकनाथ एकाएकीं नाहींसा झाला, ही बातमी पैठणभर हां हां म्हणतां पसरली. भानुदासाचें घराणें प्रसिद्ध होतेंच, तशांत एकनाथाची विलक्षण बुद्धि, अल्पवयांतच प्रसिद्धीस आलेले त्याचे अलौकिक गुण व त्याची समाधानवृत्ति ह्यांच्यायोगानें तर पैठणामध्यें आबालवृद्धांस एकनाथ माहीत होता. सर्वजण आपापल्या प्रकारें शोध करूं लागले. कोणीं गोदावरींत कोळी घातले, कोणी सर्व वाळवंट पालथें घातलें, कित्येकांनीं गांवातील विहिरींत पानबुडे उतरविले. याप्रमाणें चोहोंकडे शोध चालविला. परंतु सर्व व्यर्थ. कांहींच पत्ता लागेना.

एकनाथास दूरदूरच्या एकांत देवालयांत बसण्याची हौस असे, म्हणून गांवांतील व बाहेरील जुनाट देवालयें, भयप्रद दरी, गुहा, व भुयारें हीं सर्व धुंडिली; नाथांच्या स्नेह्यांस व सहाध्यायांस विचारिलें; गांवोगांव जासूद रवाना केले; परंतु एकनाथाची कोणाच कांहीं बातमी सांगेना.

ज्या पुराणिकाला आपला जाण्याचा बेत एकनाथानें कळविला होता व ज्याच्याकडून नाथाच्या जाण्याची थोडीबहुत माहिती मिळण्याचा संभव होता, तो पुराणीकही याचवेळेस काकतालीय न्यायानें पैठणांत अदृश्य झाला. हा पुराणीक पैठणामध्यें नेहमीं रहात असून ज्या दिवशीं प्रातःकालीं एकनाथ निघून गेला, त्याच दिवसाच्या पूर्वरात्रीं अकल्पित बेत ठरून कांहीं निकडीच्या कामाकरितां तो परगांवीं निघून गेला. याप्रमाणें नाथाचें कुशलवृत्त कळून बिचाऱ्या चक्रपाणीची काळजी दूर होण्यास कांहींच साधन नव्हतें.

एकनाथाची कांहींच वार्ता कळत नाहीं हे पाहून चक्रपाणीची कंबर खचली. त्याच्या वृद्ध पत्नीने मोठ्यानें हंबरडा फोडून धाडकन् अंग टाकून दिलें! चक्रपाणी-सही मूर्च्छा येऊन तो जमिनीवर निचेष्ट पडला! सर्व घरांत एकच कल्लोळ होऊन मोठा आकांत माजला! त्या वृद्धांचा दारुण शोक पाहून जमलेला जनसमूह दुःखांत चूर होऊन गेला. नाथाच्या जाण्याविषयी कोणाचाच कांहीं तर्क चालेना. इतका आज्ञाधारक, सुशील व शांत स्वभावाचा मुलगा रागावून कोठें पळून जाईल, किंवा एखादी अविचाराची गोष्ट करील, अशी कल्पना करवेना.

## एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी

चक्रपाणीच्या डोळ्यांला पाणी लावून व त्यास वारा घालून जवळच्या मंडळींनीं वारंवार त्यास सावध करावें व त्यास नानाप्रकारच्या गोष्टी सांगून दुःखाचा विसर पाडावा. परंतु पुत्रशोकानें आधींच विव्हळ झालेल्या अंतःकरणास पौत्रविरहाचा विसर कोठून पडणार? त्याचे नेत्र दुःखाश्रूंनीं भरून येऊन गळा दाटून येई. डोळ्यांपुढें अंधारी येऊन कांहीं दिसेनासें होई. मुलगा नाहीं तर नाहींच, परंतु नातवाच्या तोंडा-कडे पाहून जो आज पुत्रशोकाचा विसर पडत होता व वार्धक्यावस्थेंत आधारभूत होऊन ज्यानें आजपर्यंत सुख व समाधानच दिलें, त्या आधारभूत स्तंभाचें अस्तित्व अकस्मात् अनिश्चित झाल्यामुळें निराश्रित होत्सातीं तीं दोघें दुःखसागरांत बुडालीं.

जनार्दनपंत हा देशस्थ आश्वलायन ब्राह्मण होता. ह्या पुरुषश्रेष्ठाचें राहण्याचें मूळ ठिकाण चाळिसगांव असून, याचेकडे तेथील देशपांडेपणाचें काम होतें. पुढें आपल्या विद्वत्तेच्या व सद्वर्तनाच्या जोरावर मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळवून, शेवटीं दौलताबाद येथील यवन पादशाहाचा तो मुत्सद्दी होऊन बसला. जनार्दनपंत लेखणीचा बांका असून न्यायाची केवळ मूर्ति असल्यामुळें, लोकप्रिय होऊन पादशाहाचीहि त्याजवर मेहर नजर होती. दरबारांत त्याचा दरारा असून त्याच्या अनुमतीशिवाय कोणतीच गोष्ट होत नसे. शूरत्वाच्या संबंधानेंहि जनार्दनपंतांची लोकोत्तर कीर्ति होती. कसाही दुर्धर प्रसंग गुदरला किंवा शत्रु कितीही बलाढ्य असला, तथापि शत्रूबरोबर झुंजण्याचा पहिला विडा जनोबांनीं उचलावा व

जयश्रीही निरंतर त्यासच अनुकूल होऊन त्याच्या शौर्याची दरबारांत नेहमीं वाहवा व्हावी.

योग्यांनाही अत्यंत कठिण, असा सेवाधर्म, समशेरकुराणवाल्या महमदीय मंडळींत जनार्दनपंत अप्रतिहत चालवीत असून, चमत्कार हा कीं, ह्या पुरुषाच्या ठिकाणीं स्वधर्मविमुखता यत्किंचितही नव्हती. जनार्दनपंत शांकरमताचा पूर्ण अनुयायी असून, गाणगापूर येथील प्रसिद्ध नृसिंहसरस्वतींचा पट्टशिष्य होता.

**बादशहाची कृपा**

या महात्म्यानें आपल्या तपोबलाच्या योगानें केवळ हिंदूंसच चकित न करितां परधर्मद्वेष्ट्या यवनांसही धर्माच्या अद्‌भुत प्रभावानें दिपवून टाकिलें व याचमुळें प्रत्येक गुरुवारीं, जनार्दनपंतांची दत्तात्रेयाची पूजा निर्विघ्नपणें शेवटास जावी म्हणून, मोंगल-दरबार बंद असून गुरुवार हा सुटीचा दिवस मानला जात होता.

राजधुरेचें जबाबदारीचें काम, पातशहाचा करडा अम्मल, व समशेरकुराणाची दीन् दीन् शब्दध्वनित भयंकर गर्जना, इतकीं विघ्नें नियमभंग करण्यास मूर्तिमंत उभीं असूनहि या पुण्यपुरुषाची स्नानसंध्या, समाधि व दत्तात्रेयमहापूजा, ह्यांत कधींही अंतर कधीं पडलें नाहीं. ह्या पुरुषाची अध्यात्मज्ञानांत इतकी प्रवीणता असे व त्याचें आचरण इतकें शुद्ध असे कीं, ब्रह्मरूपीं लय लागून दत्तात्रेयाच्या प्रत्यक्ष दर्शनाचाहि अलभ्य लाभ या महापुरुषास होत असे.

मागें सांगितल्याप्रमाणें एकनाथानें कोणी पाहील या भीतीस्तव नीट रस्ता सोडून आडमार्गानेंच जाण्याचा क्रम चालविला. प्रवास कसा असतो तो ठाऊक नसून गैरमाहीत असल्यामुळें वारंवार देवगडचा रस्ता चुकावा. क्षुधेनें व तृषेनें प्राण व्याकूळ होऊन त्याला पदोपदीं ग्लानी यावी व झाडाखालीं पडलेल्या फळांनीं व कंदमूळांनीं कशी तरी जठराग्नीची शांति त्यानें करावी.

वाटेनें जात असतां निरनिराळे विचार त्याचे मनांत येऊन त्याची चित्तवृत्ति क्षणोक्षणीं पालटे. आपणांस त्या पुण्यपुरुषाची भेट कशी होणार, माझ्या अल्प वया-मुळें माझा धिक्कार होईल कीं काय, इत्यादि गोष्टीविषयीं विचार करीत वीस कोस जमीन पांच दिवसांत तुडवून ही वामनमूर्ति देवगडावर पंतांच्या दाराशीं येऊन थडकली.

जनार्दनपंतांची भेट घेणे झाल्यास वाड्यांत जाणारास कधींच मनाई नसे. त्याप्रमाणें पंतांची भेट घेण्याविषयीं आपला मनोदय दर्शित केल्यावर ज्या दालनांत जनार्दनपंत कांहीं दरबारचे कागदपत्र पहात बसले होते त्या ठिकाणीं एकनाथास सेवक घेऊन गेला. जनार्दनपंत कामांत गुंतले आहेत असें पाहून वाटेच्या श्रमानें श्रांत झालेला व क्षुधेनें अत्यंत पीडित झालेला एकनाथ मुकाट्यानें कोंपऱ्यांत उभा राहिला.

## गुरुशिष्य भेट

इतक्यांत जनार्दनपंतांची दृष्टी सहज तिकडे गेली. पहातात तों अष्टवर्षांची चिमुकली मूर्ति, ब्रह्मचारी वेष धारण करून कोंपऱ्यांत उभी आहे. त्या बटूची तेजःपुंज कांति, त्याचे पाणीदार डोळे, उन्हानें झालेले आरक्त शरीर, मुखावरील घर्मबिंदूंची मौक्तिक-तुल्य शोभा, सुशोभित मृगचर्मयुक्त यज्ञोपवीत व पीतवर्ण कौपीन हीं पाहून जनार्दन-पंतांस मोठें कौतुक वाटलें, व ब्रह्मचारिवेष धारण करून बटूच्या वेषानें दर्शन देण्याकरतां ही दत्ताची स्वारीच आली कीं काय, असा भास झाला. एकनाथानें जनार्दनपंत आपलेकडे पहातात असें पाहून मोठ्या नम्रतेनें साष्टांग प्रणिपात करून पंतांचे पाय घट्ट धरिले.

जनार्दनपंतांनीं एकनाथास उठविलें व त्यास आपले जवळ बसवून घेऊन 'तूं कोण ? व येथें कशाकरितां आलास ?' असें मोठ्या ममतेनें त्यास विचारिलें. जनार्दन-पंतांची सौम्य मुद्रा, त्यांचे तेजःपुंज शरीर व दयार्द्र भाषण ऐकून एकनाथास पराकाष्ठेचा धीर आला व त्याजविषयींची पूज्यबुद्धि दृढतर होऊन आकाशवाणीचें प्रत्यंतर अनु-भवास येऊं लागल्यामुळें, त्यास अपरिमित आनंद झाला. नंतर त्यानें आपले इतिवृत्त फार नम्रतेनें सांगून, आपली पुराणश्रवणाची गोडी, ब्रह्मज्ञानसंपादनाची अत्युत्कृष्ट इच्छा, परमेश्वराच्या प्रत्यक्ष दर्शनाविषयीं दृढ संकल्प व तदनुसार शिवालयांत झालेली गंभीर देववाणी ह्या गोष्टी सुरस रीतीनें यथार्थ वर्णन केल्या. एकनाथाचे मृदु भाषण, त्याचा मर्यादशीलपणा, ब्रह्मज्ञानसंपादनाची स्वभावसिद्ध स्फूर्ति व त्याचा दृढ निश्चय, हीं पाहून हा कसोटीस उतरेल असें पंतांस वाटलें व तुझ्या अंगीं पात्रता आली म्हणजे तुला उपदेश करूं,' असें आश्वासन देऊन जनार्दनपंतांनीं जवळ राहण्याची आज्ञा दिली, आणि त्यास किल्ल्यावर ठेवून घेतलें.

स्वामी जनार्दनाची रहाण्याविषयीं आज्ञा होतांच एकनाथास मोठा हर्ष झाला. नंतर आपल्या अंगची नम्रता, आज्ञाधारकत्व, सहनशीलता व ज्ञान हीं दाखवून एकनाथानें उत्तरोत्तर गुरूची पूर्ण मर्जी संपादन केली. कोणत्याही वेळीं किंवा कोण-त्याही स्थलीं पहावें, तों गुरूची सेवा करण्यास व गुरूची आज्ञा पाळण्यास हा शिष्यवर उभा आहेच. अल्प वयास, सुकुमार तनूस व मानापमानास न जुमानतां स्वामी जनार्दनास संतुष्ट राखण्याकरितां अनेक प्रसंगीं ह्या सच्छिष्यानें आपला जीव धोक्यांत घालावा, अनेक प्रकारचें साहस आचरावें, व समयविशेषीं असह्य वेदना सोसाव्या, परंतु गुरुसेवेंत काडीइतकें सुद्धां अंतर पाडूं नये.

## पूजा-अर्चनादि सर्व तयारी

स्वामीसेवेचें घोर तप आचरणाऱ्या ह्या तपस्व्यानें प्रातःकालीं उठावें. मुख-मार्जनादि विधि झाल्यावर गुरुमार्ग, गुरुगृह व देवगृह हीं उत्तम रीतीनें झाडून स्वच्छ

करावीं. जनार्दनपंतांची उठण्याची वेळ झाली म्हणजे, गुरुद्वारीं मंजुळ व सुस्वर असें गुरुस्तुतिपर गीत गावें. स्वामी उठले म्हणजे मुखमार्जनाची तयारी सुरेख रीतीनें करून ठेवावी. चांदीच्या फुल्यांचा शिसवी पाट मांडून उष्णोदकानें भरलेलीं पात्रें व दंतधावनाचें साहित्य सिद्ध करून ठेवावें. स्नानाची सर्व तयारी करून द्यावी. परिधान करण्याची वस्त्रें उत्तम रीतीनें चुणून ठेवावी. पूजापात्रें स्वच्छ करून जेथल्या तेथें मांडून ठेवावी. पंचामृतपूजेची सामुग्री सिद्ध करावी. चंदनाचें सुगंधि गंध उगाळून द्यावें. नानाप्रकारचीं रंगीबेरंगी सुवासिक पुष्पें घालून परड्या तयार ठेवाव्या. बेलाचे व तुळशींचें लक्ष निवडून मोजून ठेवावे, याप्रमाणें पूजेची सर्व तयारी करून पूजेअर्चेचा थाट व समाधीचा देखावा पाहून आनंदभरानें डुल्त, हा जनार्दनशिष्य गुरुमुखांतील प्रत्येक शब्द झेलण्यास निरंतर तत्पर असे.

एकनाथाची शरीरसंपत्ति उत्तम असल्यामुळें व त्याची बुद्धि तीव्र असल्या-कारणानें गुरुसेवेचें कडकडीत व्रत पाळण्यास, कालाचा किंवा स्थलाचा प्रतिबंध त्याला कधींच झाला नाहीं. स्वामी जनार्दन वाड्यांत असोत किंवा दरबारांत असोत, देवालयांत असोत किंवा यवनांच्या तर्फेनें रणभूमीवर झुंजत असोत, कोठें असले, तथापि या शिष्यश्रेष्ठानें यथाशक्ति गुरूस सहाय्य करून त्यांची प्रसन्नता व आपल्या विषयींचें त्यांचें प्रेम हीं वृद्धिंगत करावी.

जनार्दनस्वामींनीं आपल्या शिष्याचा निग्रह किती आहे, त्याची श्रद्धा कितपत आहे व त्याच्या अंगीं उपदेशग्रहणाची पात्रता आहे किंवा नाहीं, हें पाहाण्या-करितां त्यास नानाप्रकारचीं अचाट कृत्यें करण्यास सांगितलीं, दुष्प्राप्य व महत्कष्टसाध्य वस्तु नियमित कालांत प्राप्त करून देण्याविषयीं आज्ञा केली, भयंकर व घनघोर अर-ण्यांत सुलिंभपर्वतासारख्या अत्युच्च गिरीशिखरावर तपश्चर्यादि करण्यास सांगितलें, तथापि इतक्याही संकटांस न जुमानतां, गुर्वाज्ञेप्रमाणें सर्व गोष्टी शेवटास नेऊन, हा विजयी एकाजनार्दन, जनार्दनशिष्यत्रयांत, जनार्दनाचा पट्टशिष्य होऊन बसला; आणि वेदविद्या, गुरुप्रसन्नता व आत्मज्ञान हीं संपादन करीत, गुरुसमागमानें आनंदांत काळ घालवूं लागला.

## गुरुभक्तीचा लाभ

एकनाथास गुरूच्या समागमानें अनेक लाभ होऊं लागले, त्यानें आपल्या ज्ञान-राशीची अभिवृद्धि करण्यास सुरवात केली, व जनार्दनपंतांस अध्यात्मविषयासंबंधी शंका आणि कोट्या विचारून त्यांचें तो यथास्थित समाधान करून घेऊं लागला. पंतांनींहि, मोठ्या संतोषानें एकनाथाबरोबर वेदांत विषयावर वादविवाद करावा, त्यास तो विषय नीट समजावून देऊन त्या विषयाची खोम्यला पूर्णपणें त्याचे लक्षांत आणून द्यावी;

आणि 'अमृतानुभव' व 'ज्ञानेश्वरी' ह्यांतील ब्रह्मरहस्य एकनाथाचे हृत्पटिकेवर उत्तम प्रकारानें रेखून द्यावें.

जो एकनाथ वृद्ध आजास व आजीस सोडून आठव्या वर्षीच ब्रह्मप्राप्तीसाठीं गुरुसेवेचें व्रत आचरूं लागला त्या एकनाथाच्या ठिकाणीं एक तपपर्यंत गुरूची सेवा एकनिष्ठपणें केल्यावर व स्वामी जनार्दनासारख्या वेदांतविषयनिपुण पुरुषाकडून शंका-समाधान झाल्यावर ब्रह्मोपदेश करण्याची पात्रता येत चालली.

याप्रमाणें एकनाथाच्या गुरुभक्तीस व त्याच्या एकनिष्ठतेस उत्तम प्रकारचे कस लागूं लागल्यावर या गुरुशिष्यांचें परस्परांवरील प्रेम दृढ होत चाललें व यास लवकरच उपदेश करावा असा जनार्दनपंतांचा निश्चय झाला.

जनार्दनपंतांच्या पट्टशिष्याची, गुरुभक्तीच्या संबंधानें व अध्यात्मज्ञानाविषयीं जशी लोकोत्तर कीर्ति होती तशीच त्याचें अलौकिक धारिष्ट व अप्रतिम युद्धकौशल्य ह्यांविषयींही त्या वेळेस मोठी ख्याति होती. प्रख्यात तत्त्ववेत्ता व साधु जो सॉक्रेटिस, हा ज्याप्रमाणें भयानक युद्धसंग्रामांत आपली कर्तबगारी दाखवी, त्याप्रमाणेंच एकनाथा-नेंही अनेक प्रसंगीं आपल्या गुरूची तरफ घेऊन समशेर बहादरी गाजवावी व आपल्या उपास्य देवाचा विजयध्वज चोहोंकडे उभारावा.

## गुरूंचा यशोध्वज चहूंकडे फडकेल

एकनाथाच्या शौर्याविषयीं अशी एक चमत्कारिक आख्यायिका आहे कीं:— एके समयीं पातशहावर अकस्मात् परचक्र येऊन दौलताबाद शहराभोंवतीं शत्रूचा गराडा पडला. रणशूर जनार्दनपंतांसारखा धीराचा दुसरा कोणीच सरदार जवळ नांव घेण्यासारखा नसल्यामुळें 'शत्रूवर एकदम चाल करून जावें' असा पातशहाचा निरोप घेऊन त्वरेनें एक स्वार गडावर जनार्दनपंतांकडे आला. पंतांची ती वेळ ध्यानस्थ बसण्याची होती. स्वार आला त्या वेळेस देवगृहाचें द्वार बंद असून आंत जनार्दनपंतांनीं समाधि लाविली होती व दाराबाहेर एकनाथाचा खडा पहारा चालला होता. स्वाराचा निरोप ऐकून एकनाथ विचारांत पडला. त्यानें विचार केला कीं, 'या वेळेस स्वामी ध्यानस्थ असून राजाज्ञा विदित करावी तर समाधिभंग होतो, व न करावी तर विलंब लागून काय अरिष्ट गुदरेल कोण जाणे.' असा विचार करितो तों एकाएकी तोफांचे भयंकर आवाज ऐकूं येऊन सर्वत्र अंधार व धूळ दिसूं लागली. तेव्हां ही वेळ विचार करण्याची नाहीं असें जाणून त्यानें लागलीच पायांत सुमान चढविली, अंगांत चिलखत व डोकीला मंदिल फडकाविला; चढाऊ जोडा पायांत चढवून पाठीशीं ढाल बांधिली व एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत भाला घेऊन मनांत विचार करितो कीं, कांहीं होवो; यश

येवो किंवा अपयश येवो. दोहोंतही सारखाच लाभ होणार. यश प्राप्त झाल्यास सद्‌गुरूंचा यशोध्वज चोहोंकडे फडकेल व रणभूमीवर धारातीर्थी मरण आल्यास, स्वामिकार्यार्थ ह्या जड देहाचा उपयोग होईल.' नंतर गुरुजींस दाराबाहेरूनच नमस्कार करून "जय स्वामीजनार्दन" म्हणून तो दाराबाहेर पडला. किल्ल्याच्या खालीं येतो तों शत्रूकडील लोक रणवाद्यांचा भयंकर आवाज करीत तोफांनीं वेशी व शहराभोंवतालचा तट फोडीत आहेत! शहरांत सर्वत्र अस्वस्थता होऊन पौरजन हवालदील होऊन गेलेला आहे! पातशहाचें सर्व सैन्य तयार असून सेनानायकाच्या आज्ञेची वाट पाहात आहे! याप्रमाणें प्रकार पाहून एकनाथानें शत्रूवर एकदम तुटून पडण्याचें सूचक शिंग फुंकिलें; व आपणही वेशीचे दरवाजे उघडून सर्व सैन्यासहवर्तमान शत्रूचे तोंडावर जाऊन पडला. एकनाथानें ह्या घाईच्या वेळेस लढाईचा सर्व पोषाख जनार्दनपंतांचाच घातलेला होता, व ह्या गुरुशिष्यांचें रूपसादृश्य कांहीं मौजेचें असल्यामुळें, ह्या प्रसंगीं बतावणी करण्यास स्वरूपाचा सारखेपणा एकनाथाच्या फारच उपयोगी पडला. 'असल्या बिकट प्रसंगीं आपल्या आज्ञेस न जुमानतां जनार्दनपंत गेला नाहीं ही वार्ता पातशहास कळली असतां त्याची मर्जी खप्पा होईल, ह्या भीतीस्तव एकनाथास कृत्रिम जनार्दन होण्याखेरीज दुसरी तोडच ह्या वेळीं निघण्यासारखी नव्हती.

### शत्रुसैन्याची दाणादाण

स्वामिसेवा करण्याकरितां प्रसंगविशेषीं एकनाथ समरभूमीवरही जात असे; त्यामुळें केवळ गुरुसहचार्यानेंच निशाण मारणें, भाला फेंकणें, भरधांव घोडा टाकणें, इत्यादि गोष्टींत तो निष्णात झाला होता, व त्यास आपल्या गुरूचें युद्धकौशल्यही पूणपण माहीत होतें. वय तरुण, स्वरूपांत सादृश्य, पोशाख खुद्द जनार्दनपंतांचा, व युद्धकौशल्याची पूर्ण माहिती ह्या इतक्या गोष्टीमुळें एकनाथाच्या कृतींत, स्थितींत किंवा रूपांत यत्किंचित् सुद्धां विसंगतपणा दिसला नाहीं; व हा आपला सेनानायक जनार्दनपंत आहे किंवा दुसरा कोणी आहे, हें त्या घाईच्या वेळेस कोणासच ओळखितां आलें नाहीं.

पातशहाचें सैन्य बाहेर येतांच उभयपक्षांकडील सैन्य एकत्र होऊन भयंकर रणकंदन माजलें. एकनाथ आपल्या सैन्यास वारंवार उत्तेजन देत व घोडा वाऱ्यासारखा फेंकीत, शत्रूचीं शिरें भराभर तोडूं लागला. एकनाथाचें हस्तकौशल्य पाहून उभयपक्षांकडील लोक तोंडांत बोट घालून राहिले! शत्रूकडील लोक अधिक असल्यामुळें पातशहाचे लोकांनीं प्रथम थोडी माघार घेतली, परंतु लोक कडवे असून त्यांस नाथासारखा मोहरा अधिपति मिळाल्यामुळें पातशहाचे लोक दीन् दीन् करीत शत्रूवर तुटून पडले! आणि शत्रुसैन्याची दाणादाण करून त्यांस हाकलून लाविलें!!

यांप्रमाणें हा कृत्रिम जनार्दन विजयी होऊन सैन्यासहवर्तमान नगरांत आला. हिकडे समाधिविसर्जन झाल्यावर जनार्दनपंत बाहेर येऊन पाहातात तों एकनाथ तेथें नसून देवद्वारांत एक कागद मात्र पडलेला आहे. नंतर कागद हातांत घेऊन वाचतात तों त्यांत, पातशाहावरील संकट, त्याची निकडीची आज्ञा, व निरुपायास्तव आपण केलेलें साहस याचें संक्षिप्त रीतीनें एकनाथाने वर्णन केलें आहे. तें वाचून आपल्या शिष्याची समयसूचकता, स्वामिभक्ति व धारिष्ट पाहून जनार्दनपंत थक्क होऊन गेले.

**पाठ थोपटली**

एकनाथ समरभूमीहून निघाला तो थेट किल्ल्यावर आला. सर्व शरीर रक्तानें व धुळीनें माखलें आहे, वार लागून त्यांतून रक्ताचे प्रवाह चालले आहेत, लढाईचा पोशाख अस्ताव्यस्त होऊन गेला आहे, अशा भयानक मुद्रेनें ही कृत्रिम जनार्दनाची स्वारी एका हातांत समशेर, व दुसऱ्या हातांत शत्रूकडील सैन्याधिपतीचें शिरकमळ घेऊन गुरुदर्शनास आली; व साष्टांग नमस्कार घालून मोठ्या विनयाने उभी राहिली. जनार्दनपंतांनीं आपल्या विजयी शिष्याच्या अलौकिक शौर्याची फार तारीफ केली; व गुदरलेला प्रसंग मोठ्या शहाणपणानें पार पाडल्यामुळें त्याची पाठ थोपटली.

सर्व शहरांत व दरबारांत जनार्दनपंतांच्या अद्वितीय शौर्याची फार वाहवा झाली व पातशहाची मर्जी सुप्रसन्न होऊन मानाचीं वस्त्रें व पालखी जनोबांस आणण्याकरितां गडावर पाठविली.

—:०:—

**लहान मुलांच्या आंकडीवर**
**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६. मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :
**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# रामकालीन आदर्श कुटुंब व्यवस्था

## सुखी संसाराचें चित्र

**रामायण काळांत प्रत्येक कुटुंब सुखासमाधानांत होतें. रामराज्य सुखी व आदर्श राज्य. त्या काळांत आजच्यासारखें रुपयाचें अवमूल्यन करावें लागत नव्हतें व महागाईमुळें प्रजाजनांस त्रस्त व्हावें लागत नव्हतें. एकमेकांस सहाय्य करूं, अवघें धरूं सुपंथ हा त्याकाळीं सर्वांचा सहज मार्ग होता. कोणी कोणाला दूषण देत नव्हता व तसें कारणही उपस्थित होत नसे.**

जातिभेद, वर्गभेद किंवा गरीब-श्रीमंत असा भेद नसल्यामुळें सर्व कुटुंबांत गृहस्थाश्रमाचा आनंद होता, त्यामुळेंच वर्गविग्रह नव्हता. कोणत्याही जातीच्या कुटुंबाकडे पाहिलें तर कोणीही सुतकी चेहरा असलेला पाहायला मिळत नसे. मुलें बुद्धिवान् आणि शुद्ध बुद्धीचीं होतीं आणि पत्नी कटु भाषण बोलणारी नव्हती. लुटणारे किंवा भाकरीचा तुकडा टाकलेला असेपर्यंतच प्रेम करणारे मित्र नव्हते, तर संकटांत खांदे देऊन मदत करणारे मित्र होते. प्रेमळ असणाऱ्या मालकाचें हृदय जाणणारे आणि आज्ञाधारक सेवक होते. आजच्याप्रमाणें शेटला शिव्या देणारे, हाक मारल्यानंतर सुद्धां न येणारे आणि "मि० रामा" या उपाधीची अपेक्षा करणारे नोकर नव्हते. अशा तऱ्हेचा गृहस्थाश्रम कांहीं आकाशांतून पडत नसतो किंवा रामकालासाठीं ती ईश्वराची विशिष्ट देणगी सुद्धां नव्हती. तो काल कल्पनातीत परिश्रमांचा परिणाम होता. आज आपण इतक्या हीन अवस्थेला येऊन पोंचलों आहोंत कीं आपली बौद्धिक आणि मानसिक शक्ती इतक्या संकुचित क्षेत्रांत वावरत आहे कीं, ज्यामुळें हें वर्णन आम्हांला कविकल्पना आहे असें वाटतें! यावर आपला विश्वासच बसत नाहीं कीं, अशा तऱ्हेचा सुसंस्कृत समाज शक्य असेल काय? याचें कारण असें कीं, एका बाजूला मुलांची रडारड, दुसऱ्या बाजूला शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं भांडणें, काळजीमुळें निद्रानाश आणि जरा झोंप लागली तर ढेंकणाची गोरिला प्रवृत्ति, रेशनिंगचें रूक्ष भोजन या सर्व गोष्टी कमी पडल्यामुळेंच कीं काय त्यांत आणखी भर म्हणजे कठोर बोलणारी पत्नी, या गोष्टी नित्याच्या अनुभवाच्या आहेत.

## एकमेकांवर निष्ठा

रामकालीन गृहस्थाश्रम आदर्श होते याचें कारण त्या काळांतल्या प्रत्येक व्यक्तीची एकमेकांविषयीं अव्यभिचारी निष्ठा हें होय. अव्यभिचारी निष्ठा हें सुखाचें कारण आहे. ही निष्ठा कमी झाली कीं सुख कमी होणारच. आजच्यासारखे केवळ रुपये आणे पै यांचे संबंध नव्हते. विवाहसंस्थेच्या मूलभूत हेतूंचें पालन केलें जात होतें. लोक विवाह संस्थेचीं कारणें ओळखून वागत असत. मूलभूत हेतु नष्ट झालेले नव्हते. अनियंत्रित कामोपभोगावर कसें नियंत्रण ठेवावें याचा रामायणांत पूर्ण विचार केलेला होता. अशा तऱ्हेनें विवाहसंस्थेच्या मूलभूत हेतूंचा अभ्यास करून सामाजिक उन्नतीसाठीं त्यांचा स्वीकार करण्यांत आला होता.

स्त्रीपुरुषांचे संबंध निसर्ग नियमाप्रमाणें चालत असत, चालतात आणि चालणार. विवाहसंस्थेच्या अगोदर स्त्रीपुरुषांचे संबंध असे होते कीं, त्यांचें फल स्त्रीलाच भोगावें लागे, पुरुष सुटून जात. त्यामुळें पुरुषांना गोवण्यासाठीं विवाहसंस्था निर्माण करण्यांत आली कीं ज्यामुळें शुद्ध अंतःकरणानें बालक आणि स्त्री यांचें भरण–पोषण व्हावें. लग्न–विवाह–समाजाच्या कल्याणासाठीं आणि व्यक्तीच्या विकासासाठीं आवश्यक आहेत. संपूर्ण रामायण वाचून पाहाल तर व्यक्तीच्या सुखाकरितां झालेला विवाह कुठेंही पाहायला मिळणार नाहीं !

आज प्रेमाच्या ऐवजीं मोहच आढळून येतो. प्रेम एक स्वतंत्र तत्व आहे आणि मोह हें दुसरें स्वतंत्र तत्व आहे. पितळ सोन्याप्रमाणें दिसली तरी दोहोंत खूपच फरक असतो. प्रेम हें सोनें आहे आणि मोह ही पितळ आहे. हा भेद आपल्या ध्यानांत येणार नाहीं, विद्वान् ऋषि–मुनि किंवा बुद्धिमान् माणसें यांतील भेद जाणूं शकतात. रामायणांत प्रेमाची सत्ता मान्य केलेली होती–मोहाची नव्हे.

पुरुष पैसा आणी व स्त्री घरसंसार चालवी. हा घरसंसार सुखानें चाले. पुरुषाच्या हातांत पैसा असला तर त्या पैशाचा वाटेल तसा दुरुपयोग होईल म्हणून स्त्रीच्या हातांतच पैशाची व्यवस्था ठेवण्यांत आली होती, परंतु आर्थिक स्वातंत्र्य कोणालाही नव्हतें. योगक्षेमाच्या प्रत्येक साधनांत स्त्रीनें धांवपळ केली पाहिजे, आर्थिक स्वातंत्र्य असलें पाहिजे वगैरे गोष्टी त्या काळांत नव्हत्या.

## रामकाळांतील स्त्रिया

रामकाळांत स्त्रिया स्त्रियाच आणि पुरुष पुरुषच होते, म्हणून कुटुंब–व्यवस्था सर्वांत उत्कृष्ट तऱ्हेनें चालत असे. याच्या ऐवजीं स्त्रैण पुरुष आणि स्त्री–पुरुषासारखी झाली कीं कुटुंबसंस्था बिघडली म्हणूनच समजावी. स्त्रिया द्रव्य मिळवूं शकतात. पुरुषांचें काम स्त्रिया करूं शकतात.” असें लोक म्हणतात. स्त्रियांनासुद्धां यांत मोठे-

पणा वाटतो. स्त्रिया असें म्हणतात कीं, ' पुरुष जें करतात तें काय आम्हीं करूं शकणार नाहीं ? नक्कीच करूं शकूं !' आणि ही गोष्ट सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांच्या सामर्थ्याच्या बाबतींत आम्हांला मुळींच शंका नाहीं. ही गोष्ट रामायणाला सुद्धां मान्य होती, त्यामुळेंच ज्यावेळीं रामानें जंगलांत जायचें मान्य केलें त्यावेळीं वसिष्ठांनीं स्पष्ट सांगितलें कीं,

आत्मा हि दारा सर्वेषां दारसंग्रहवर्तिनाम् ।
आत्मेयमिति रामस्य पालयिष्यति मेदिनी ॥

स्त्री हा पतीचा आत्माच आहे. सीता हा रामाचा आत्मा असल्यामुळें ज्यावेळीं राम वनांत जाईल त्यावेळीं सीताच राज्य चालवील. स्त्री राज्य करील हें सांगतांना वसिष्ठ बिलकूल डगमगले नाहींत. पतीच्या राज्यावर स्त्रीचा हक्क आहे—हें कैकेयीला माहीत होतें त्यामुळें तिनें भरताला गादी मिळावी असा पहिला वर मागितला होता. हें योग्यच झालें कीं ज्यामुळें रामायणाची निर्मिति झाली; सीता राज्य घेईल कीं नाहीं हें निराळें. थोडक्यांत म्हणजे त्याकाळीं स्त्रियांना इतके हक्क होते. ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे कीं वसिष्ठांसारखेसुद्धां असें म्हणतात कीं, "सीता अयोध्येचें राज्य चालवूं शकेल."

परंतु स्त्रिया जें करूं शकतात तें पुरुष करूं शकतील कीं नाहीं ? याचीच शंका आहे. स्त्रियांचें काम पुरुष करूंच शकणार नाहींत. गर्भधारण, अपत्यसंगोपन, त्यांचें शिक्षण या गोष्टी पुरुष कधींच करूं शकणार नाहींत. त्याचबरोबर जें जें सुंदर आहे, महान् आहे, हृद्य आहे, उदार आहे, मंगल आहे, पवित्र आहे थोडक्यांत म्हणजे ईश्वराजवळ नेणारें जें जें आहे तें पुरुषापेक्षां स्त्रीच चांगल्या तऱ्हेनें करूं शकेल आणि ही त्यांची शक्ति ज्या कामामुळें नाहींशी होईल अशा प्रकारचें कोणतेंहि काम स्त्रियांकडून करवून घेण्याची रामकालीन लोकांची तयारी नव्हती. त्यामुळेंच स्त्रीनें अर्थार्जन करावें यांत वैशिष्ट्य आहे, मोठेपणा आहे असें त्याकाळांत लोक मानीत नसत. स्त्रीजवळ प्रेम करण्याची आणि ज्याच्यावर प्रेम करील त्याला सर्वस्व अर्पण करण्याची शक्ति आहे. स्त्री डॉक्टर झाली नाहीं तरी चालेल, वकील झाली नाहीं तरीहि कांहीं बिघडणार नाहीं, टाईपिस्ट तर होऊंच नये, परंतु स्त्रीनें, माता, सखी आणि सहचारिणी व्हावें. सुखदुःखांत भाग घेणारी, अश्रू पुसणारी स्त्री संसारांत नसेल तर पुरुषाचें काय होणार ? अशा तऱ्हेची स्त्री त्याकाळांत होती त्यामुळेंच संसार उत्कृष्ट तऱ्हेनें चालत असे.

स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य कशाकरितां पाहिजे हेंच लक्षांत येत नाहीं ? रामकाळांत मिळालेला पैसा स्त्री—पुरुष दोघांचा होता आणि पतिपत्नी वेगळीं नव्हती तर एकच होतीं.

## विकृत कल्पना नव्हत्या

बस कंडक्टर पैसे देतो त्यावेळीं आपण डाव्या किंवा उजव्या खिशांत ते ठेवतों व त्याची आपण परवाही करत नाहीं. कुटुंबांत मानसिक ऐक्य असलें तर स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्याची गरजच नाहीं. मानसिक द्वैत--विभक्तपणा-आला कीं, आर्थिक स्वातंत्र्य आलेंच. जग स्त्री जातीला फसवीत आहे. आणि भोळ्या भगिनी फसत आहेत. तूं स्वावलंबी हो हें सांगण्यांत पुरुषांची लबाडी आहे. यामुळें पैसा मिळविण्याचा असलेला संपूर्ण भार जो पुरुषावर आहे तो नाहींसा होतो. स्त्रीजातीच्या तर्फें मी वकिली करतों कीं, स्त्री आर्थिक क्षेत्रांत संचार करील परंतु घर आणि भोजन वगैरे इतर गोष्टींची सोय करा. हें सर्व सहकारी वृत्तीनें करणार आहांत काय ? किंवा हें सर्व वैज्ञानिक पद्धतीनें एखाद्या खोलींत करणार काय ? ही सर्व व्यवस्था केल्यानंतर स्त्रीला आर्थिक क्षेत्रांत जाऊं द्या. स्वागत करणें, पैसा मिळविणें, आणि घर संभाळणें असा दुहेरी तिहेरी भार पुरुष स्त्रियांवर लादीत आहेत. त्या अशिक्षित आहेत. त्या भगिनींच्या हें ध्यानांत येत नाहींच परंतु सुशिक्षित महिलांना सुद्धां हें कळत नाहीं. जर गर्भधारण, अपत्यसंगोपन वगैरे कुटुंबाची व्यवस्था--निसर्गानें स्त्रीवर टाकलेल्या बोजाची व्यवस्था--दुसरीकडे होणार असेल तरच स्त्रियांना आर्थिक क्षेत्रांत संचार करायला कांहींहि हरकत नाहीं. नाहींतर ¾ ओझें आहेच आणि शिल्लक राहिलेलें ¼ ओझें सुद्धां त्यांच्या डोक्यावर देऊन अर्थोपार्जनाच्या जबाबदारींतून सुटणाऱ्या सद्गृहस्था ! स्त्रीचा खरा उद्धार करायला निघालास खरा ? याज्ञवल्क्य वगैरे लोकांचे ठिकाणीं प्रेमच नव्हतें आणि तुला एकदम प्रेमाचा उमाळा आला काय ? असें बोलणाराला पुन्हां असें विचारावयास पाहिजे कीं व्यक्तिगत अभिरुचीचे विचार नाहींसे केलेस काय ? त्याच प्रमाणें व्यवस्था केली आहे काय ? कारण कीं एवढें असेल तरच स्त्री आर्थिक क्षेत्रांत स्वैरपणें संचार करूं शकेल.

थोडक्यांत म्हणजे रामकाळाकडे दृष्टिक्षेप केला तर असें आढळून येईल कीं, रामकाळांत विकृत आध्यात्मिक कल्पना नव्हती त्याचप्रमाणें अनियंत्रित सुखोपभोग पण नव्हते.

मानवाला सुधारावयाचें तर आहे पण तें कसें होणार ? कुटुंब हें एक युनिट होतें आणि कुटुंबांतले लोक स्वतःच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकास करण्याचा प्रयत्न करीत असत, त्यामुळेंच समाज पूर्ण विकसित होता. प्रत्येक मनुष्य एक युनिट संभाळील आणि साफ करील तर सर्व गांव स्वच्छ होईल आणि त्याच पद्धतीनें सर्व मानव जात शुद्ध होईल. त्याकाळीं प्रत्येक व्यक्ति बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकास करीत असे.

## पतीपत्नी संबंध

रामकाळांत लग्न म्हणजे केवळ बाह्य लग्न नव्हतें, तर मनाचें लग्न, हृदयाचें लग्न होतें. देहावर असलेलें प्रेम हें खरें प्रेम नाहीं. उद्यां रोगानें कुरूप झाला तर ? आपण देहापासून सुरवात करून देहातीत होऊं. देहांत राहिलेल्या आत्म्याला जाणून त्याची प्राप्ति करून घ्यावयास पाहिजे. पति फक्त देहाची पूजा करीत असेल तर पत्नीला अपमान वाटला पाहिजे. तात्पर्य आपण मातीचे गोळे नव्हत. गोळ्याच्या आंत असलेली उदात्तता आपण जाणली पाहिजे. पतीला पाहिल्याबरोबरच पतींतील दिव्यता पत्नीला दिसली पाहिजे आणि पत्नी दिसल्याबरोबरच पतीला स्वतःची पत्नी देवी वाटली पाहिजे. लग्न म्हणजे उपभोगाचें साधन आहे हें मानण्याचें मनुष्य जोंपर्यंत सोडणार नाहीं तोंपर्यंत दुःखें येणारच.

लग्न म्हणजे प्रेम आणि कर्तव्य करण्याकरितां संसाराच्या रणांगणांत उभे राहणे. लग्न समाजाचा आधार मानण्यांत येत असे. 'अतिथिदेवो भव' ही उपासना करण्यासाठीं कुटुंबव्यवस्था आहे. प्रेम आणि कर्तव्य यांचें पालन करण्यासाठीं सक्रिय उभें राहाणाऱ्यांच्या घरांतच एकात्मता आणि प्रेमरज्जु यांनीं बांधलेल्या व्यक्ति असतात. तेथें पंचवीस मतें आहेत. भिन्न भिन्न मतें असतील तर ती खाणावळ होय. खाणावळींत प्रत्येकाची मतें. योग्यता आणि विचार वेगवेगळे असतात. खाणावळींतल्या प्रत्येकाचा सवतासुभा असल्यामुळें लोक जेवून निघून जातात. आज तर पतिपत्नीसुद्धां खाणावळीप्रमाणें घरांत राहतात. मोहदृष्टीनें पतिपत्नी एकमेकांकडे पाहातात. स्त्रीदाक्षिण्याच्या नांवावर स्त्रीच्या सभोंवतालीं चार दिवस गुंजन, आलिंगन वगैरे गोष्टी करतो आणि स्त्रियांना मान दिला पाहिजे, असे म्हणून स्वतःला स्त्रीचा सन्मान करणारा म्हणवून घेतो. प्रेमदृष्टीनें पाहाणाऱ्यांचाच गृहस्थाश्रम "धन्यो गृहस्थाश्रः" होऊं शकतो. पुरुष स्त्रीकडे उपभोगाच्या दृष्टीनें पाहतो आणि स्त्रीदाक्षिण्याच्या गप्पा मारणारे लोकसुद्धां स्त्रियांकडे केवळ उपभोगाच्या दृष्टीनें पहात असतात; शेवटीं एका गोठ्यांत बांधलेल्या दोन पशूंप्रमाणें स्त्रीपुरुष राहतात !

'रामकाळांत 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता ।" असें लोक मानीत असत. रामायण वाचतांना असें आढळून येईल कीं रामकाळातच खरोखर स्त्रियांची उत्कृष्ट अवस्था होती. आज लग्न म्हणजे सुखावस्था ही कल्पना आहे. परंतु खरोखर त्यांतही ३/४ भाग दुःखेंच भोगायचा असतो आणि १/४ भागच सुख मिळत असतें. म्हणून त्या दुःखाच्या वेळीं एकमेकांचे अश्रू पुसण्यासाठीं एखादें आत्मीय माणूस असावें म्हणून लग्नाची जरूरी आहे.

## गाडी रुळावरून घसरली आहे

सुखदुःखांत दोघांचें अद्वैत होतें. मोहामुळें तारुण्यांत प्रेमाचा आभास असतो,

परंतु वृद्ध झाल्यानंतरचें जीवन गोठ्यांत बांधलेल्या दोन पशूंप्रमाणें होतें. ममत्व हे कांहीं प्रेमाचें निदर्शन नव्हें. पाळलेल्या कुत्र्यावर ममत्व निर्माण होतें; कारण कीं जर खरोखर प्रेम असतें तर पत्नीच्या मृत्युनंतर विवाह करण्याचा विचार आला नसतां. लोकव्यवहारासाठीं 'तेरा दिवस झाल्यानंतर पाहूं, असेंसुद्धां सांगत नाहीं. एका गृहस्थांनी असें सांगितलें होतें 'शास्त्रीमहाराज! माझ्या आजारी पत्नीसाठीं रु. १०००० खर्च केला! पण कांहीं यश आलें नाहीं. एवढ्या पैशांत दुसरी स्त्री आणली असती. लोक असें म्हणतात कीं याज्ञवल्क्यांनीं पण गृहस्थाश्रम केला आणि आम्हीं पण गृहस्थाश्रमी आहोंत, आमच्यांत आणि त्यांच्यांत काय फरक? त्यांना असें सांगायला पाहिजे कीं माणसाच्या आणि कुत्र्याच्या गृहस्थाश्रमांत फरक आहे. कुठें याज्ञवल्क्यासारख्यांचा आदर्श गृहस्थाश्रम कीं ज्यांच्या वृद्धावस्थेंतसुद्धां परस्परांचें दिव्य प्रेम एक रेसभरसुद्धां कमी झालें नाहीं; आणि कुठें आपण कीं ज्यांच्या जीवनांत परस्परांचें आकर्षण तारुण्यांत सुद्धां मोहामुळेंच असतें?

गृहस्थाश्रम म्हणजे दोन व्यक्तींच्या आत्मिक विकासाचें स्थान सद्गुण आणि सदाचार यांचें शिक्षण घेण्याची शाळा. केवळ शयन करणें आणि जेवणें यांकरितां संसार करण्याची गरज नाहीं. त्याकरितां राहण्याच्या व जेवण्याच्या उत्कृष्ट व्यवस्थांनी युक्त अशीं उपहारगृहें निर्माण झालेलीं आहेत. गृहस्थाश्रमांत प्रगति करण्यासाठीं पतिपत्नीचें शारीरिक आरोग्य असावयास पाहिजे त्याचप्रमाणें मानसिक आरोग्यसुद्धां असावयास पाहिजे.

रामकाळच्या लोकांचे परिश्रम मोठेच होते. परंतु आपली रुळावरून गाडी घसरली आहे, तिला पुन्हां चढविण्यासाठीं आजच्या विसाव्या शतकांतसुद्धां रामकाळ येऊं शकेल. लग्नाचा मूलभूत हेतु जाणला पाहिजे. विवाहाच्या वेळच्या पवित्र आशीर्वादात्मक मंत्राचा अभ्यास करून पहा.

"समानीव आकूतिः।
समाना हृदयानि वः।
समानस्तु वो मथः।" वगैरे.

समान अभिप्राय–हेतु, समान हृदय, समान मग, सर्वच समान ठेवण्याची प्रेरणा देणारे हे मंत्र आहेत. सप्तपदीचा एक एक मंत्र जीवनांत अमृतासिंचत करणारा आहे. मला असें वाटतें कीं तुळशीविवाह ज्याप्रमाणें दरवर्षी केला जातो त्याप्रमाणें वैवाहिक जीवनाची प्रतिज्ञा करण्यासाठीं दरवर्षी विवाहाचा वाढदिवस साजरा करावयास पाहिजे, परंतु आज जावयांबरोबर वऱ्हाडी लोकांचें लक्ष विवाहाच्या वेळच्या आइस्क्रीमच्या बशांवरच असतें!

लग्नांत पतिपत्नींनीं परस्परांच्या हृदयपुष्पांची शुभ्रमाळच समर्पण करावयाची असते परंतु आज फक्त फुलांचीच माळ किती सुवासिक, आकर्षक आणि किंमती असतें तें आपण

पाहातोंच. परस्परांच्या हृदयाचीं पुष्पे अशीं सुगंधी किंवा शुभ्र असत नाहींत. याचें कारण हें आहे. मध्यें हृदय शुभ्र आणि स्वच्छ राहूं शकत नाहीं. त्यामुळें हृदय अर्पण करणें होऊंच शकत नाहीं. हजार ठिकाणी गेलेले हृदय आणि दहा हजार ठिकाणी गेलेलें मन एक दुसऱ्याला आत्मसमर्पण कसें करूं शकणार ? याचा परिणाम लग्न म्हणजे बंधन झालें तर त्यांत आश्चर्य तें कसलें ?

पावित्र्य आणि मांगल्य हीं कुटुंबांतून जाणार नाहींत याची दक्षता घेतली पाहिजे. आश्रमासारखी दृष्टि प्रत्येक स्त्रीपुरुषाची—स्वतःच्या संसाराकडे असेल तरच जीवनांत प्रेम पावित्र्य आणि मांगल्य येऊं शकतें—सीतेबरोबर परत येतांना राम एका जंगलांत येतो. त्यावेळीं एका आदर्श ऋषींची आणि ऋषिपत्नीची हकीकत सांगत असतांना राम सीतेला म्हणतो कीं, या ठिकाणीं एक झोपडी होती. त्यांत एक ऋषि आणि ऋषिपत्नीं राहात होती. त्यांचें ध्येय प्रत्येकाला विश्रांत देणें हें होते. आज ती दोघेंही या ठिकाणी नाहींत पण त्यांचें काम त्यांनीं लावलले हे वृक्ष करीत आहेत. वडिलांचें कर्तव्य मुलगे पुढें चालवीत आहेत. दुसऱ्याला सांगण्यापूर्वी प्रत्येकाचें लक्ष आपल्या घराकडे असलें पाहिजे. आपापले संसार साफ करून पहा. जगाला सुधारायला निघाला आहेस, परंतु घरीं आई रडत आहे ती पहा ना ! असें आज सांगावें लागतें.


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडर**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# दीनांचा वाली परमेश्वर

लेखक : अप्पाराव

बालपणापासून शांता देवभक्त होती. देवाच्या पूजेचें साहित्य जमा करणें, बागेंत जाऊन देवाला व्हाण्यासाठीं फुलें आणणें हें तिला मनापासून आवडायचें. तो तिचा एक आवडता छंद होता म्हणा ना.

बालपण संपलें. शांताचें वय लग्नायोग्य झालें तरी तो छंद कमी न होता वयाबरोबर वाढतच गेला, देवपूजेंत प्रार्थनेंत वेळ घालवणें तिला फार आवडायचें.

शांताचें लग्न झालें आणि ती आपल्या पतीच्या घरीं आली. तेथेंही तिचा तो देवपूजेचा छंद कायम होता. तो आपल्याबरोबर घेऊन आली होती ती. खरं सांगायचं म्हणजे माहेरीं होती तोंवर तो छंद चालू शकला. कोणाच्या डोळ्यांत भरला नाहीं. परक्या माणसांच्या समोर तो कसा चालावा ? त्याबद्दल चर्चा होऊं लागली. सासूबाई तर हात धुवून शांतीच्या मागें लागल्या.

त्या म्हणाल्या, "काय हें सूनबाई ! कसली पूजा आणि कसलें काय ? कामधामाचा वेळ देवपूजेंत खर्च करायचा याला काय म्हणायचं ! देव कुठें बाहेर का आहे ? तो अंतर्यामी आहे. आपल्या व दुसऱ्यांच्या देहांची काळजी घ्यावी. देवपूजेचें कसलें प्रदर्शन चालवलं आहेस ? घरांतील कामधाम करणार कोण ? आपल्या पतीची सेवा कर. हा काय खेळखंडोबा चालवला आहेस ?"

परिस्थिती अशी होती कीं शांता पतीच्या किंवा कोणाच्याही सेवेंत कसूर करीत नव्हती. देवपूजेंत असली तरी उठून पतीची आज्ञा पालन करीत होती. परंतु कांहीं वेळ पूजा अर्चा करण्यांत घालविल्याशिवाय तिला चैन पडत नसे. तिचा तो स्वभाव गुण बनला होता. तिचा इलाज चालत नव्हता.

तिच्या पतीचे नांव होते शशिधर. तो घरी आला म्हणजे त्याला कांहीं ना कांहीं लागायचें. त्यासाठीं शांतीला धुंडाळावे तर ती देवघरांत ध्यानस्थ बसलेली. तिला कशी उठवायची ! त्यांच्यापुढें पेचप्रसंग निर्माण व्हायचा. तो मनांतल्या मनांत जळफळायचा आणि बाहेर निघून जायचा !

रोजच्या रोज असें घडूं लागलें. जेव्हां पहावें तेव्हां बायको ध्यानमग्न, शर्थ

झाली तिच्या पुढें! असली बायको काय कामाची! कधीं कधीं आपण दुसरं लग्न करावं व या बायकोला सोडचिठ्ठी द्यावी असा विचार शशिधरच्या मनांत यायचा!

तो आईजवळ आपली तक्रार घेऊन जायचा. आई दुःखीकष्टी व्हायची. तिनें सूनबाईची अनेक वेळां कान उघडणी करून पाहिली. परंतु तिच्या कार्यक्रमांत फेरबदल होण्याचा कांहींच रंग दिसेना. तिनें हात टेकले होते तिच्यापुढें!

सासूनेंही आतां निर्धार केला होता कीं, शशीधरचें दुसरं लग्न करायचंच! तरुण वय. त्याची उमेद, त्याचें सुखसमाधान नको का व्हायला?

या बाबतींत घरांत कुजबूज चालत असे; परंतु शांतेच्या कानापर्यंत ती आली नव्हती. कशी येईल? शांता घरांतलें कामकाज करायची व आपल्या आवडत्या देवपूजेंत प्रार्थनेंत सदान् कदा गढलेली असायची. ती मनातल्या मनांत म्हणायची कीं, मी कामचुकारपणा करीत नाहीं. पतीच्या सेवेंत कमरता करीत नाहीं, मग मी कोणाला कां घाबरावें?

शेजारणींतही वार्तालाप होऊ लागले. शशिधर म्हणे बायकोला कंटाळला आहे! तो दुसरं लग्न करण्याच्या विचारांत आहे!

ही वार्ता एकेदिवशीं शांतेच्या कानीं आली. कधीं ना कधीं ती यायचीच होती-

एके दिवशीं शांतीच्यानें रहावेना. तिनें धीर करून आपल्या पतीचें मनोगत समजून घेण्याचा निर्धार केला.

ती आपल्या पतीला मोठा धीर करून म्हणाली, काय हो! "हें खरं आहे का? आपण म्हणे दुसरं लग्न करण्याच्या विचारांत आहांत?"

शशिधर चपापला. थोडा वेळ थांबून तो उत्तरला, "होय! मी सध्यां त्या विचारांत आहे हें खरं आहे! नाहींतर काय करूं मी? मला गृहसंसार चालवायचा आहे. तुझं लक्ष घराकडे नाहीं. तें लागून राहिलं आहे देवाकडे! आईला वाटतं घरांत मूलबाळ असावं. घर भरून जावं."

"आपण वाटेल तो विचार करायला स्वतंत्र आहांत. आपणास कोणी अटकाव करूं शकत नाहीं. परंतु घर चालविण्यासंबंधी म्हणाल तर मी घर नाहीं का चालवीत? मूलबाळ व्हावं असं मला नाहीं कां वाटत? मीसुद्धां माणूस आहे. मलाही भावना आहेत."

या उत्तरानें शशिधर चिडल्यासारखा झाला. तो म्हणाला, "शांते! तुझं लक्ष घराकडे बिलकूल नाहीं. मी जेव्हां जेव्हां बाहेरून येतो तेव्हां तेव्हां तूं हातांत माळ घेऊन देवघरांत जप करीत बसलेली असतेस. मी कांहीं बोलावें, कांहीं मागावें तर तूं ध्यानस्थ! काय बोलणार आणि मागणार! त्या दगडाच्या मूर्तीच्या नादीं तूं कां लागली आहेस आणि तुला त्याच्याकडून काय मिळवायचं आहे, समजत नाहीं मला!"

शांतेच्या मनावर मोठाच आघात झाला. ती अस्वस्थ झाली. ती म्हणाली, "शर्थ झाली आपल्यापुढें ! मला बोला काय हवं तें; पण देवाला काय नांवें ठेवतां ? म्हणे दगडाची मूर्ती ! बाई ! बाई ! काय म्हणावं समजत नाहीं. देव माणसांत आहे तसा दगडांतही आहे. देव सर्वत्र व्यापलेला आहे. त्याच्यामुळें हें जग चाललं आहे हें मी का सांगायला पाहिजे ? आपल्या घरांत मुलबाळ नाहीं याची खंत वाटते आपणाला. मला माहीत आहे. त्याला मी काय करणार ! परंतु आपल्या शेजारची मुलें तीं आपलींच नव्हत का ? त्यांच्यावर कां नाहीं प्रेम करीत ? त्यांना देवानेंच निर्माण केलं आहे. मला समजतें तुम्हीं कामवासना पुरी करून घेण्याच्या मार्गे अहांत, त्यापुढे सर्व व्यर्थ, देव नाहीं आणि कांहीं नाहीं. असें वाटतं आपणाला. पतीपत्नी संबंध अत्यंत पवित्र आहे. एकमेकांनीं एकमेकांस सहकार देऊन संसाराचा गाडा चालवायचा असतो. देवाकडे पाठ फिरवून या जगांत कोणाचेंही चालणार नाहीं."

शशिधरला पत्नीचें तत्त्वज्ञान ऐकून घ्यायचें नव्हतें, त्या वृत्तींत तो नव्हता. तो ताडकन् म्हणाला, "तुझ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मला नको ऐकवूं शांता ! मी दुसरें लग्न करण्याचा निर्धार केला आहे. त्याला तूं आपली लेखी संमती दे म्हणजे झालें. मग तूं आणि तुझा देव ! काय वाटेल तें कर !"

"एवढंच ना ? माझी लेखी संमति पाहिजे तुम्हांला ? तुम्हांला कोण अडवूं शकणार आहे ? मी तुमच्या आड मुळींच येणार नाही. पण एक गोष्ट कधी विसरूं नका. वासनांची भूक कधीही शांत होणार नाहीं. वासनांच्या जाळ्यांत जितकें जावें तितका माणूस खोल खोल खड्ड्यांत जाऊन पडतो."

शांता भावनावेगांत बोलून गेली परंतु तिला रडूं आवरणें अशक्य झालें.

कांही न बोलतां शशिधर तेथून निघाला तो घराबाहेर कुठें तरी गेला. शांता आपल्या खोलींत जाऊन ओक्साबोक्शीं रडूं लागली म्हणत होती, कीं हे बालकृष्ण ! तूं आमचा किती अंत पहाणार आहेस ? माणसें निर्माण करतोस. त्यांच्या मनांत नाना वासना, विकार उत्पन्न करतोस; आणि तूं स्वस्थपणें खेळ पहात बसतोस. माझी तुला दया नाहीं कां येत ? माझें जीवन केवळ दुःखांत होरपळण्यासाठीं आहे का ? या दुःखांतून सुटका करून तूं आपल्या पायांपाशीं मला कां बरे घेऊन जात नाहींस ?

इतक्यांत शांताची सासू खोलींत येऊन म्हणाली, "सूनबाई ! तो लेखी संमती मागत आहे. दिलीस कीं त्याला लेखी संमती ?"

सासू स्वार्थी तशीच मोठी चतुर होती. तीं पुढें गोड आवाजांत म्हणाली, "तसं नाहीं ग ! हा कायद्याचा प्रश्न आहे ना ? पुढें अडचण येऊं नये !"

" वाटेल तेवढ्या संमत्या लिहून घ्या आणि दुसरा नाहीं, तर चारपांच विवाह करा. आणि मुलांबाळांना खेळवीत बसा ! "

" एवढं माझं भाग्य कुठं आहे सूनबाई ? काय ग, पण तूं अशी वैरागी कां बनलीस ? तुला नाहीं का मुलांची हौस ! तुझ्या विचित्र वागणुकीला कंटाळून माझा मुलगा वेश्यांचीं घरें हिंडूं लागला आणि अलिकडे तर त्याचा मदिरेशीही संबंध जडला आहे. याला कारण कोण ? तूंच ना ! "

" माझा नाहीं. तुमचा दोष आहे. तुम्हांला त्यांना योग्य वळण लावतां आलं नाहीं. त्यांना वाटेल तसं वागूं दिलंत. "

" काय ? काय आणि कोणाला बोलत आहेस हें तूं ? मोठी देवभक्तीण आली ! तुझे देव फेकून देईन घराबाहेर ! काय समजलीस ? "

शांता तरीही रागाच्या जाळ्यांत सांपडली नाहीं. ती म्हणाली, " मर्जी तुमची ! माझे देव फेकून दिलेत तरी माझं काय बिघडणार आहे. माझा देव माझ्याजवळ आहे. माझ्या अंतःकरणांत आहे. माझ्या देवांनाच कां ? मलाही हांकलून द्या ना घराबाहेर ! मी याक्षणीं जायला तयार आहे. जेथें देवाला कोणी मानीत नाहीं त्या घरांत राहून करायचं काय ? "

आतां मात्र सासूबाई नरमल्या. म्हणाल्या, " तूं आपल्या नवऱ्याचें रंजन कां करीत नाहींस ? चांगलीं वस्त्रें कां नेसत नाहींस ? अलंकार का घालीत नाहींस ? काय कमी आहे तुला ? माझ्या मुलाच्या भावना कां जुमानीत नाहींस ? "

शांताला कांहींच बोलायचें नव्हतें. ती आपल्या कामधंद्याला लागली. घरांतील कामें आटोपून ती आपल्या आवडत्या देवघरांत जाऊन ध्यानस्थ बसली. तो तिचा नेमनेम होता.

रात्रींचा अंमल सुरू झाला. शशिधर आपली बाहेरचीं कामें संपवून त्या दिवशीं घरीं आला तो चिकार मद्यपान करून. त्या दिवशीं पिण्यांत त्यानें धरबंद ठेवला नव्हता. तो भानावर नव्हता. त्याचे डोळे लालबुंद झालेले होते.

तो आला तो शांतीच्या खोलात शिरला व तिच्या अंगावर खेकसून म्हणाला, " तुझं भजनच चाललें आहे नाहीं ? चल ऊठ ! आज मला सोक्षमोक्ष लावून घ्यायचा आहे. ऐक मी सांगतों तें ! "

शांता दचकून उठली. त्या अवस्थेंत पतीला पाहून ती म्हणाली, " काय हें ! चिकार पिऊन आला आहांत ! ही का माणुसकी झाली ! "

दारूच्या धुंदींत असलेला शशिधर एकदम चिडला. त्यानें आपल्या खिशांतून भला मोठा चाकू बाहेर काढला. म्हणाला, "मी दारू प्यालों तर तुझं काय झालं ? तूं कोण मला विचारणारी ? थांब, आज तुझा समाचार घेण्यासाठींच मी आलों आहें! आतां तुझी धडगत नाहीं!"

क्रोधावेश स्थितींत शशिधर तोंडाला येईल तें बडबडत होता. तो चाकू उघडत असतां त्याची आई एकदम ओरडली–"अरे बापरे! साप साप! अरे विषारी काळा नाग!"

शशिधर भानावर कुठं होता तें ऐकून घ्यायला ? त्यानें चाकू उघडला व शांतीवर वार करणार तोंच सर्पानें त्याच्या पायांला विळखा घातला. आतां मात्र शशिधरची धुंदी उतरली. त्याच्या हातांतील चाकू खालीं पडला आणि हें काय अरिष्ट आलें आपल्या वांट्याला म्हणून खालीं वांकून पहाण्याचा प्रयत्न करूं लागला! ओरडूं लागला. "आई आई! आई!! साप! मला सोडव याच्या विळख्यांतून!

शांतेनें पाहिलें, तों काय ? एका विषारी काळ्या नागोबानें शशिधरच्या पायाला घट्ट विळखा घातला आहे व त्यानें आपला फणा वर केला असून तो जोरजोरानें फुत्कार सोडतो आहे!

मोठा भयानक देखावा होता तो! प्रसंग कठीण होता! कठीण म्हणजे काय ? प्रत्यक्ष मृत्यूशीं सामना होता तो! सामना कसला ? मृत्यू समोर ठाकला होता!

शशिधरची आई गर्भगळीत झाली असल्यास नवल कसलें ?

आतां तिला देव आठवला. प्रसंगाशिवाय देवाची आठवण होत नाहीं. तिनें शांतीला हात जोडले व म्हणाली, "सूनबाई! आतां तुझ्या पतीचे प्राण तुझ्या हातीं आहेत. तुझा देव खरा असला तर या मरण-संकटांतून तूंच त्याची सुटका करूं शकशील. सारं विसर आणि तुझ्या देवाची करुणा भाक! या घराची लाज राख."

परंतु शांतेच्या हातीं काय होतें ? प्राण घेणारा सर्प समोर दिसत होता. त्याला ओढून काढण्याचें सामर्थ्य तिच्याठायीं नव्हतें. देवावर तिची संपूर्ण निष्ठा होती. तोच होता तिचा एकमेव आधार! ज्यानें संकट पाठविलें तोच त्याचें निवारण करणारा!

एका निरापराध अबलेवर दुर्धर–नव्हे मरणाचा प्रसंग ओढवला होता. तिच्यावर प्राणघातक हल्ला होऊं घातला होता. देवाला हें कसें सहन होईल ? मग भगवंताची ख्याति ती काय राहिली ? संकटांत सांपडलेल्या आपल्या भक्तांचें संकट निवारण करणें हें भगवंताचें ब्रीद. त्या ब्रीदाला जागल्याशिवाय तो कसा राहील ?

**सतींना संतांना जरि कधीं जगीं दुष्ट छळिती।**
**तयांना रक्षाया अवनिवरि ये मी रघुपती॥**

असें आश्वासन भगवंतानें आपल्या प्रिय भक्तांना देऊनच ठेविलें आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव येथें आला.

शांतेनें तेथल्या तेथें गुडघे टेकले. नतमस्तक होऊन तिनें हात जोडले. डोळे भरून आले होते तिचे. ती प्रार्थना करीत होती, "भगवंता! नागरूपानें माझ्यासाठीं धांवून आलास! तुझ्या कृपेला अंतपार नाहीं. तूं दीनांचा कैवारी, अनाथांचा नाथ! आतां कृपा कर आणि माझ्या पतिदेवाची या संकटांतून मुक्तता कर. माझें सौभाग्य मला दे."

नंतर नागदेवाजवळ जाऊन व हात जोडून शांता म्हणाली, "हे नागराज! माझ्या पतीचे प्राण घेऊं नकोस. वाटल्यास त्याऐवजीं मला विळखा घाल. माझे प्राण घे. म्हणजे मी तुझ्या पायांशीं कायमची येईन. परंतु माझ्या पतीदेवाला जगूं वाचूं दे. त्यांना सुखांत राहूं दे."

आणि काय आश्चर्य! देव शांतेच्या प्रार्थनेला तात्काळ पावला. नागोबानें शशि-धरच्या पायांना घातलेला विळखा तात्काळ सोडला व तो आल्या वाटेनें निमूटपणें निघून गेला.

शशिधर व त्याची आई या दोघांवर या दुर्धर प्रसंगाचा क्रांतिकारक परिणाम झाला. आणि तो व्हायचाच.

शशिधर शांतीजवळ जाऊन म्हणाला, "शांता! मी अपराधी आहे. आज या प्रसंगानें माझे डोळे उघडले. आतां मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. मी भटकत कुठेंतरी चाललों होतो. यापुढें मी दारूला स्पर्श करणार नाहीं. परस्त्री मातेसमान मानीन. तूं या घरची देवता आहेस. आज मी देवाला स्मरून शपथ घेत आहे. आतां दुसऱ्या लग्नाचा प्रश्नच पुढें येऊं शकत नाहीं. आतां यापुढें तूंच माझें सर्वस्व!

—आधारित



# ज्ञानेश्वरीचें तत्त्वज्ञान

## संतांची भगवंताशीं एकरूपता

—गुरुदेव रानडे

**सूर्यानें सूर्यास ओवाळावें, चंद्रानें चंद्रास आलिंगन द्यावें किंवा दोन समान प्रवाह एकमेकांत मिसळावे त्याप्रमाणें संतांचें परस्परांवरील सारखें उत्कट प्रेम एकत्र मिसळून त्यापासून सामरस्याचें प्रयाग बनतें व त्यावर अष्ट सात्त्वीक भाव तरंगत रहातात. त्या आनंदांत भरांत ते स्वतःला विसरतात व मी त्यांच्या अंतःकरणांत भरून राहिल्यामुळें ते सर्व अगास माझा महिमा वर्णन करून सांगतात.**

### अनुभूतीचे नैतिक परिणाम

आपण आत्मानुभवाच्या नैतिक परिणामांचा विचार करूं या. "तो अंतरीं परमात्मरूपांत दृढपणें स्थिर झाला असला तरी बाह्यतः सामान्य मनुष्याप्रमाणेंच वागतो. तो इंद्रियांना आज्ञा करीत नाहीं किंवा विषयांचें भय धरीत नाहीं. जें जें उचित कर्म करावयाचें, तें तें तो योग्य वेळीं व यथाविधि करतो. कर्मे करीत असतां कर्मेंद्रियांचा संयम करण्याची आवश्यकता त्यास वाटत नाहीं व तो त्यांच्या आहारींहि जात नाहीं. तो मोहमलानें लिंपत नाहीं. पाण्यानें धुतलेल्या कमळाप्रमाणें तो स्वच्छ असतो. संसारांत राहून तो सामान्य मनुष्यासारखाच दिसतो खरा; परंतु, तो पाण्यांत प्रतिबिंबित झालेल्या सूर्याच्या बिंबाप्रमाणें संसारापासून अलिप्त असतो. सामान्यतः पाहिल्यास तो साधारण मनुष्यासारखाच दिसतो; तथापि, त्याच्या स्वरूपाचा निर्धार करणें अशक्य आहे. जो आशापाशरहित व संसारपाशापासून मुक्त झाला आहे, त्यास या चिन्हांनीं ओळखावें. सहाव्या अध्यायांत पुनः साक्षात्कारी पुरुषाचीं लक्षणें श्रीज्ञानेश्वरांनीं दिलीं आहेत. ते म्हणतात, "अशा साधुपुरुषानें शरीर धारण केलें असलें तरी तो वस्तुतः ब्रह्माच्या बरोबरीनें तोलतो. कारण, त्यानें आपलीं सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवलेलीं असतात. मेरूएवढा प्रचंड सोन्याचा पर्वत व यत्किंचित् मातीचें

ढेंकूळ दोन्ही तो सारखींच मानतो. पृथ्वीच्या मोलानेंहि विकत घेतां येणार नाहीं, असें अमूल्य रत्नदेखील तो दगडाप्रमाणें लेखतो. आतां त्यानें कोणास बंधु मानावें व कोणास वैरी मानावें ? मीच विश्व आहें, असें ज्ञान त्यास झाल्यामुळें तो सर्वांची सारखीच काळजी वाहतो. तो स्वतः तीर्थांचा राजा बनतो; त्याचें दर्शन पुण्यप्रद होतें व त्याच्या संगतींत भ्रांतालाहि ईश्वराचें ज्ञान होतें. त्याच्या शब्दांनीं धर्म जिवंत राहतो. त्याच्या दृष्टीनेंहि महासिद्धि प्राप्त होते. स्वर्गादि सुखें म्हणजे त्याचा नुसता खेळ ! सहज चुकून त्याची आठवण करणाऱ्यासहि तो आपली योग्यता देतो." श्रीज्ञानेश्वर पुनः एका परिच्छेदांत सांगतात कीं, "आदर्श संत सदा पूर्ण चंद्रासारखा असतो व अधमास आणि उत्तमास सारखाच प्रकाश देतो. त्याची समता अखंड असते. त्याची सर्वभूतमात्रावरील दया अनुपमेय असते. त्याचें मन कधींच बदलत नाहीं. एखादी प्रिय गोष्ट घडली म्हणून तो आनंदानें बेहोष होत नाहीं वा अप्रिय गोष्ट घडली तरी विषाद मानीत नाहीं. म्हणून आदर्श संत–हर्ष–शोक–रहित, आत्मबोधपूर्ण व स्थितप्रज्ञ असतो."

**आत्मज्ञाचें रूपकात्मक वर्णन**

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायांत ईश्वरी साक्षात्कार झालेल्या साधूचें रूपकात्मक वर्णन दिलें आहे :–"पावसाळ्याच्या शेवटीं मेघ ज्याप्रमाणें आकाशास सोडून जातात, त्याप्रमाणें मोह व मान त्यास सोडून जातात. केळीं झाडावर पक्व झालीं म्हणजे तीं आपोआप गळून पडतात. झाडावर घरटीं बांधून राहत असलेलीं पांखरें त्या झाडास आग लागली असतां दाही दिशांस उडून जातात, त्याप्रमाणें सर्व विकल्प त्यास सोडून पळतात. लोखंडास परीस सांपडत नाहीं किंवा अंधारास प्रकाश सांपडत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या मनास द्वैतभाव माहीत नसतो. असा आत्मज्ञ म्हणजे राजहंसच होय. तो आत्म–क्षीरसागरांतील अनात्म–पाणी काढून टाकतो व आत्मक्षीराचेंच सेवन करतो. आत्मज्ञानाच्या अभावीं चारहि दिशांस पसरलेली वस्तु ज्ञानदृष्टीनें तो एकत्र करतो. गंगेचा ओघ सागरांत बुडतो, त्याप्रमाणें त्याचा विवेक आत्मस्वरूपाचा निर्धार करण्यांत मग्न होतो. अग्नीच्या डोंगरावर पेरलेलें बी अंकुर धरत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या मनांत विकार उत्पन्न होत नाहींत. समुद्र–मंथनाच्या वेळीं रवीप्रमाणें उपयोगी पडलेला मंद्रादि एकदां क्षीर–सागरांतून बाहेर काढल्यावर स्तब्ध राहिला, त्याप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत वासनांच्या लाटा उसळत नाहींत. पूर्ण चंद्रमा जसा सर्व बाजूंनीं पूर्ण असतो, त्याप्रमाणें त्याच्यांत कोणत्याहि प्रकारें अपेक्षेचें न्यून दिसत नाहीं.

**ज्ञान्यांचा मुकुटमणि**

पुनः ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायांत ईश्वराशीं एकरूप झालेल्या आत्म-

ह्यांचीं आणखी कांहीं लक्षणें दिलीं आहेत : "आदर्श संत सकाळ, दुपार व संध्याकाळ, या तिन्ही काळांची गणना न करणाऱ्या सूर्यासारखा असतो. युद्धभूमीप्रमाणें तो जेता किंवा जितहि नसतो. घरीं जेवावयास बोलावलेल्या पाहुण्याप्रमाणें किंवा चौरस्त्यावरील मार्गदर्शक खांबाप्रमाणें तो उदास असतो. परंतु, सूर्याच्या अस्तित्वामुळें जगांतील सर्व व्यवहार घडतात, त्याप्रमाणें त्याच्या सत्तेमुळें हें जग चालतें. समुद्राला भरती येते, चंद्रकांत मणि द्रवतो, कमळ विकसतें, तरीहि चंद्र मात्र स्तब्ध राहतो; त्याप्रमाणें गुणांच्या गजबजण्यानें तो चळत नाहीं. शरीरभावरूपी पाण्यांतील मासोळी बनल्याशिवाय मनुष्यास सुखदुःखांचा त्रास होत नाहीं. मनुष्य आपल्या स्वरूपांत स्थिर झाला म्हणजे त्याला सुख व दुःख समान होतात. घरांतील खांबास रात्र व दिवस सारखींच असतात त्याप्रमाणें आत्माराम ज्याच्या देहीं ओतप्रोत भरला त्यास सर्व द्वंद्वें सारखींच वाटतात. निद्रिताच्या अंगास साप व उर्वशी समान वाटतात, त्याप्रमाणें आत्मरूपीं राहणाऱ्या संतास परस्परविरोधी गुण समान होतात. काळोख व प्रकाश सूर्यास सारखेच, त्याप्रमाणें स्वरूपीं राहणाऱ्या संतास निंदा व स्तुति सारख्याच वाटतात. सर्व ऋतूंमध्यें आकाश अलिप्त राहतें, त्याप्रमाणें वैषम्य त्याच्या मनास शिवत नाहीं. तो मूर्तिमंत अग्नि असल्यामुळें त्याच्या कर्मांची फळें जळून जातात." तो एकाग्र चित्तानें माझी भक्ती करतो; म्हणून तो जरी गुणांचें सेवन करीत राहिला तरी तो त्यांना आपल्या स्वाधीन ठेवूं शकतो. आतां एकाग्र अथवा अव्यभिचारी भक्ति म्हणजे काय हें पाहूं या. रत्नाचें तेज म्हणजेच रत्न, द्रवपणा म्हणजेच पाणी, अवकाश म्हणजेच आकाश, गोडी तीच साखर, गोठलेलें एकत्रित बर्फ म्हणजेच हिमालय, मुरलेलें दूध म्हणजेच दहीं, त्याप्रमाणें हें सर्व विश्व म्हणजेच मी. मला शोधण्यासाठीं विश्वाचें अस्तित्व नाकारण्याचें कारण नाहीं. सर्व विश्व माझ्यांत समाविष्ट झालें आहे. याप्रमाणें माझ्या स्वरूपाचा अनुभव घेणें म्हणजेच व्यभिचारी भक्ति होय." "सोन्याचा कण सोन्यांत मिळून जातो, प्रकाशाचें किरण प्रकाशांत मिसळतात, हिमाच्या परमाणूंनीं हिमालय बनतो, त्याप्रमाणें व्यक्तिगत जीवात्म्याचा परमात्मा होतो. तरंग लहान असले तरी ते समुद्राशीं एकरूप होत, हा अनुभव म्हणजेच खरी भक्ति होय." "हें साऱ्या ज्ञानाचें शिखर आहे; हें सर्व योगाचें सर्वस्व आहे. सागर व जलचर यांच्यामध्ये अखंड धारा लागावी व दोन्हि एक व्हावे अथवा प्रकाशाच्या स्पर्शानें बिंब व प्रतिबिंब एक व्हावी त्याप्रमाणें आत्मा परपुरुषांत एकवटून जातो. सर्पण जळल्यानंतर अग्नि विझतो, त्याप्रमाणें भेदाचा नाश करून ज्ञान आपणहि नाहींसें होतें. मी ऐलतीरावर आहे व माझा भक्त पैलतीरावर राहतो, अशी वस्तुस्थिति नाहीं. आम्हां दोघांचें अनादि ऐक्य आहे, हें जो जाणतो तोच खरा ज्ञान्यांचा मुकुटमणि होय."

## अष्ट सात्त्विक भाव

परमेश्वर–दर्शनानें शारीरिक व मानसिक परिणाम काय होतात, याचें रहस्य श्रीज्ञानेश्वरांनीं अकराव्या अध्यायांतील एका परिच्छेदांत सांगितलें आहे. हें वर्णन भारतीय अनुभूति–शास्त्रांत ' अष्ट सात्त्विक भाव ' या नांवानें सुप्रसिद्ध आहे. " विश्व एक व आपण एक असें जें थोडेंसें दुजेपण होतें, तेंहि आटून गेलें व अंतःकरण एकदम शांत झालें. आंतून आनंदाचा झरा वाहूं लागला, बाहेरून इंद्रियें पांगुळलीं. वर्षा-कालाच्या आरंभीं पर्वतावरील सर्व प्रदेश कोवळ्या गवतानें आच्छादून जातो, त्याप्रमाणें नखशिखांत शरीर रोमांचामुळें पुलकित झालें ! चंद्रकांत मण्यावर चंद्राचे किरण पडले म्हणजे त्यावर थंड पाण्याचे थेंब सांचतात, त्याप्रमाणें त्याच्या शरीरावर स्वेद–कणिका दाटली. कमलकलिकेंत भुंगा सांपडला असतां, ती जशी जलपृष्ठावर डोलूं लागते, त्याप्रमाणें अंतःकरण सुखाच्या ऊर्मींनीं भरून गेल्यामुळें साधकाचें शरीर बाहेरून कांपूं लागतें. कापुरकेळींतील गाभ्याचे आंतील पडदे उकलले असतां आंत कापुर खचून भरलेला असल्यामुळें त्यांतून कापुराचे कण गळतात, त्याप्रमाणें त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागतात. चंद्राचा उदय झाला म्हणजे भरलेल्या समुद्रासहि भरती येते, त्याप्रमाणें अंतःकरणांत वरचेवर आनंदाच्या लहरी येत असल्यामुळें त्याचें हृदय वारंवार उचंबळून येऊं लागतें. याप्रमाणें आठहि सात्त्विक भावांत जणुं स्पर्धा सुरू होते व जीवास ब्रह्मानंदाचें साम्राज्य प्राप्त होतें. "

## भय व आनंद यांची स्पर्धा

परमार्थांत साधकाची प्रगति होऊं लागली म्हणजे त्याच्या अंतःकरणांत भय व आनंद या दोन भावांमध्यें स्पर्धा कशी सुरू होते हें अर्जुनाच्या बाबतींत विशेष स्पष्टपणें दिसून येतें, ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे. श्रीकृष्णानें अर्जुनास आपलें विश्वरूप दाखविलें, तेव्हां तो भयभीत झाला व श्रीकृष्णास म्हणाला, " देवा, हा मातीचा देह जावो अथवा राहो, याची फिकीर मला नाहीं; परंतु हें तुझें भव्य विश्वरूप पाहून माझें चैतन्य राहील किंवा नाहीं याचीच मला भीति वाटूं लागली आहे ! माझ्या बुद्धीचा मीपणा या भयानें नष्ट होऊं पहात आहे आणि निश्चल व आनंदमय अशा माझ्या अंतरात्म्यासहि कंप सुटला आहे. देवा, या साक्षात्काराचें केवढें हें सामर्थ्य ! माझा बोध देशोधडीस गेला व आपला गुरु–शिष्य–संबंधहि क्षणांत नाहींसा होईल ! " या भयाच्या विरुद्ध अद्वैत–स्वरूपानंदाचें वर्णन आहे ! अनुभूतीच्या भयानकतेमुळें भीति वाटते, तर तिच्या नाविन्यामुळें व अनन्यसाधारणतेमुळें आनंद वाटतो. ऐक्यभावांत सर्व अद्वैताचा लोप होतो व यांतच अनंत आनंदाचा झरा आहे. " पक्षी फळ चाखतो त्यावेळीं त्यास फळ आपल्याहून भिन्न आहे असें वाटतें. आत्मस्वरूपाचा अनुभव आला, तर त्या आनंदमय स्थितींत एक अशी ऊर्मी उठतें कीं, जिच्यामुळें सर्व अहंकाराचा नाश होतो

व सुखाची मिठी हढावते. या आलिंगनसमयीं ऐक्यभावाचा आपोआप उगम होतो व पाणी पाण्यांत मिसळून एक व्हावें तशी अवस्था होते आणि आकाशांत वायु विरला कीं वायु व आकाश ही द्वैताची भाषा नष्ट होते, त्याचप्रमाणें त्या स्वरूपालिंगनांत केवळ आनंदभावच बाकी रहातो. द्वैताचा तर नाश होतोच, परंतु या स्थितीस ऐक्यस्थितीहि म्हणतां येत नाहीं; कारण, ही स्थिति अनुभवण्यास एकहि साक्षी राहात नाहीं."

## शेवट गांठणारा विरळा

ही स्थिति फारच थोड्या लोकांना व क्वचित्च अनुभवतां येते. परमार्थमार्गावरील प्रत्येक साधकाच्या नशिबीं हें असतें असें म्हणतां येणार नाहीं, ही गोष्ट श्रीज्ञानेश्वरांनीं मुद्दाम नमूद केली आहे. शेवट गांठणारा साधक विरळा, असें सातव्या अध्यायांत त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. हजारों लोकांपैकीं एखाद्यालाच परमार्थ-मार्गास लागण्याचें धैर्य होतें व अशा धैर्यवानांपैकीं ज्यास खरें ज्ञान प्राप्त होतें असा विरळाच निघतो. असंख्य लोकांमधून एखाद्याचीच सैन्यांत सैनिक म्हणून निवड होते व प्रत्यक्ष रणांगणावर लढ़ाई लागल्यावर शस्त्रास्त्रांचा खणखणाट सुरू होऊन तीं एकमेकांच्या अंगांत घुसूं लागलीं म्हणजे अशा लक्षावधि सैनिकांपैकीं एखाद्याच्याच गळ्यांत विजयश्री माळ घालते, त्याप्रमाणें भक्तीच्या व आस्थेच्या महापुरांत कोट्यावधि जिज्ञासू उडी टाकतात; परंतु, परमेश्वर-प्राप्तीच्या पैलतीरीं पोंचणारा एखादाच निघतो!

## क्रम-मुक्ति

परमार्थांत पूर्णता क्रमशः प्राप्त होते असें श्रीज्ञानेश्वरांनीं अगदीं स्पष्टपणें सांगितलें आहे. परमार्थ-मार्गावर पाऊल ठेवतांच अंतिम ध्येय गांठण्याचा उतावळे-पणा कोणी करूं नये, "आत्मसाक्षात्काराची बौद्धिक तयारी पूर्णपणें केली असली व सुदैवानें सद्गुरु भेटून त्यांनीं त्यास खऱ्या मार्गाचा उपदेश केला, तरी औषध घेतल्या-बरोबर गुण येऊन रोगी तात्काळ बरा होईल काय? सूर्य उगवल्याबरोबर मध्यान्ह होईल काय? जमीन चांगली नांगरली, पाण्यानें भिजविली व नंतर तिच्यांत उत्तम बीं पेरलें तरी अलोट पीक येण्यास वेळ लागणारच! त्याचप्रमाणें वैराग्य लाभलें, सद्गुरु भेटले व अंतःकरणांत विवेकाचा अंकुर फुटला, तरी जग मिथ्या असून एक परमेश्वरच सत्य आहे हे सानुभव ज्ञान प्राप्त होण्यास वेळ लागणारच! ब्रह्मांत एकत्वानें ब्रह्म होऊन राहणें हे क्रमानेंच साधेल. भुकेलेल्याच्या पुढें पंचपक्वान्नांचें ताट वाढलें, तरी त्यास तृप्ति घास घेतल्यावरच प्राप्त होणार! त्याप्रमाणें वैराग्याच्या तेलानें विवेकाचा दिवा पेटविला म्हणजे त्या दिव्याच्या प्रकाशानें आत्मठेवा शोधून काढतां येईल.

## क्रम–मुक्तीचा खरा अर्थ.

ज्ञानेश्वरींतील शेवटचा अध्याय म्हणजे श्रीज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची परिणतीच होय. या अध्यायांत त्यांनीं परमेश्वर–प्राप्ति क्रमानेंच होते असें प्रतिपादिलें आहे. बीजगणितांत हायपरबोला या आकृतीचीं दोन्हीं टोकें मूळ रेषांच्या अधिकाधिक जवळ जवळ जातात, परंतु त्यांना प्रत्यक्ष कधींच भिडत नाहींत. त्याप्रमाणें जीव परमात्म्याच्या अगदीं जवळ जवळ जातो, परंतु त्याशीं एकरूप कधींच होत नाहीं, असा या क्रम–मुक्तीचा भावार्थ आहे. परमार्थांत जीव क्रमानेंच ईश्वर–स्वरूपांत समरस होत जातो व या ऐक्य–भावांतहि तो ईश्वरापेक्षां सदैव किंचित् कमीच कसा राहतो हें सर्व श्रीज्ञानेश्वरांनीं अठराव्या अध्यायांत अनेक अलंकारांच्या सहाय्यानें मोठ्या बहारीनें वर्णिलें आहे: "वैराग्याचें चिलखत अंगावर चढवून असा संत राजयोग–रूपी घोड्यावर स्वार होतो व विवेकाच्या मुठींत ध्यानाची तलवार दृढ धरून आपल्या–समोर आलेल्या लहानमोठ्या संकटांचें निवारण करतो. सूर्य जसा अंधारांत निःशंक–पणें शिरतो, त्याप्रमाणें तो संत संसार–रणांत मुक्तिकांता वरण्यासाठीं बेधडक शिरतो. अहंकार, दर्प, काम, क्रोध इत्यादि त्याच्या मार्गांत आडव्या येणाऱ्या शत्रूंचे तो तुकडेतुकडे करतो. मग मांडलिक राजे सम्राटास सामोरे जातात त्याप्रमाणें सर्व सद्‌गुण त्याच्या स्वागतार्थ सामोरे येतात. परमार्थाच्या राजमार्गावर तो चालला असतां, पावलोंपावलीं अवस्थारूपी अप्सरा त्याचें स्वागत करतात व त्याची पूजा करतात. ऋद्धि–सिद्धि–रूपी कुमारिका सामोऱ्या येऊन त्यास आरती ओंवाळतात. हा अपूर्व देखावा पाहण्यासाठीं हजारों शक्तिदेवता त्याच्या भोंवतीं जमतात व त्याजवर पुष्पवृष्टि करतात. याप्रमाणें तो खऱ्या स्वराज्याच्या प्राप्तीच्या जवळ जवळ येऊं लागतो तेव्हां त्यास हें सर्व त्रैलोक्य आनंदानें भरलेलें दिसतें. मग त्यास शत्रु, मित्र कोणीहि उरत नाहीं. सर्वत्र समता नांदूं लागते व 'मी'–'तू'–पणाचा नाश होतो. याप्रमाणें सर्व शत्रुवर्ग जिंकल्यावर व जगास तुच्छ मानल्यावर त्याचा योगतुरंग थोडी विश्रांति घेतो. वैराग्याचें चिलखत या वेळेपर्यंत त्याच्या शरीरास जें चिकटून होतें तें तो थोडें ढिलें करतो व समोर कोणीहि शत्रु शिल्लक न राहिल्यामुळें तो ध्यानाची तलवार मागें घेतो आणि गांवास जावयाचें तें गांव दिसूं लागलें म्हणजे जसा मनुष्य सावकाश चालूं लागतो, त्याप्रमाणें आत्मसाक्षात्काराचें ध्येय त्याला दृग्गोचर होऊं लागल्यावर तो आपलें साधन कमी करतो. सागराच्या जवळ आल्यावर गंगेचा खळखळाट बंद होतो, पतीजवळ येतांच पत्नीचा कंप नाहींसा होतो, केळीं पक्व झाल्यावर केळीच्या झाडाची वाढ खुंटते किंवा गांवाकडे वळणारा मार्ग गांव लागतांच गांवांत लुप्त होतो, त्याप्रमाणें आत्मसाक्षात्कार होऊं लागला हें त्यास कळतांच तो आपलें साधन–हत्यार हळूच खालीं ठेवतो व ज्याप्रमाणें

चतुर्दशीचा चंद्र पौर्णिमेच्या पूर्णचंद्रापेक्षां किंचित कमी असतो, पंधरा कसाचें सोनें सोळा कसाच्या उत्तम सोन्यापेक्षां किंचित डावे ठरतें, किंवा समुद्र व नदी यांतील फरक स्थिरता व खळखळ यांवरून दिसतो, त्याप्रमाणें ईश्वर व ईश्वरी साक्षात्कार झालेला भक्त यामध्यें एवढाच सूक्ष्म भेद राहतो. तो ईश्वरांत मिळून जातो; परंतु ईश्वराच्या पूर्णतेच्या मानानें त्याच्यांत न्यून राहतें. ”

## संतांचा एकमेव विषय ईश्वर.

आतां श्रीज्ञानेश्वरांनीं जीव व ईश्वर यांच्या ऐक्यविषयीं काय प्रतिपादिलें आहे तें पाहूं. संतांना ईश्वर हा एकच सर्वंकष विषय असतो असें श्रीज्ञानेश्वरांनीं सांगितलें आहे. “ या शरीर–संयोगाच्या रात्रीं तो एकटाच फिरत असतांना कर्मक्षयाची पहांट आपोआप व एकदम झाली. गुरुकृपेच्या उषःकालानंतर आत्मानुभवाचें कोवळें ऊन्ह पडलें व त्याच्या दृष्टीपुढें साम्याचा विस्तीर्ण प्रदेश पसरलेला दिसला. त्या वेळीं तो पाही त्या ठिकाणीं त्यास माझें स्वरूप दिसूं लागलें. तो निवांत राहिला तरी मीच त्याच्यापुढें राहिलों ! त्याला सर्वत्र माझ्याशिवाय कांहींच राहिलें नाहीं. घट पाण्यांत बुडविला तर त्याच्या आंत–बाहेर पाणीच भरून राहतें, त्याप्रमाणें तो माझ्यांत व मी त्याच्या आंत–बाहेर भरून राहिलों आहे. अर्जुना, हा नुसता बोलावयाचा व अर्थहीन शब्दांचा विषय नव्हे, तर हा प्रत्यक्ष अनुभव आहे ! ”

## भक्तांचा सुख–संवाद

भक्तांचें परमेश्वरावर अव्यभिचारी प्रेम असल्यामुळें, त्यांच्याबद्दल तसेंच प्रेम करणाऱ्या संतांविषयींहि त्याला तितकेंच उत्कट प्रेम वाटूं लागतें. अशा भक्तांच्या आपापसांतील एका परिच्छेदांत सुख–संवादाचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं फार उत्तम प्रकारें दहाव्या अध्यायांतील एका परिच्छेदांत केलें आहे :–“ ते अंतःकरणानें माझ्याशीं एकरूप झालेले असतात व मी त्यांचा प्राण बनतों, आत्मानुभवाच्या धुंदीनें त्यांना जीवन–स्मरणाचा विसर पडतो.या आत्मज्ञानाच्या मदानें व सुखसंवादाच्या संतोषानें ते नाचूं लागतात व एकमेकांना ते आतां बोधच देतात व घेतात. एकमेकां-शेजारीं असलेलीं दोन सरोवरें पाण्यानें उचंबळलीं तर एकमेकांतील तरंग एकमेकांत मिळतात व अशा संमिश्र तरंगापासून जणुं तरंगांचींच धवलागारें वा सफेत मंदिरें निर्माण होतात; त्याप्रमाणें या एकांतिक भक्तांचे आनंद–कल्लोळ एकमेकांत मिसळून त्यांची जणुं वेणी बनते व एकमेकांस बोधाच्या अलंकाराप्रमाणें शोभून या बोधानेंच मिरवतात. सूर्यानें सूर्यास ओंवाळावें, चंद्रानें चंद्रास आलिंगन द्यावें किंवा दोन समान

प्रवाह एकमेकांत मिसळावें, त्याप्रमाणें या संतांचें परस्परांवरील सारखें उत्कट प्रेम एकत्र मिसळून त्यापासून सामरस्याचें प्रयाग बनतें व त्यावर अष्ट सात्विक भाव तरंगत राहतात. या आनंदभरांत ते आपल्यास विसरतात व मी त्यांच्या अंतःकरणांत भरून राहिल्यामुळें ते सर्व जगास माझा महिमा वर्णन करून सांगतात. गुरुशिष्यांच्या एकांतीं ज्या अक्षरांचा उच्चार झाला होता, ते हे संतश्रेष्ठ मेघाप्रमाणें गर्जना करून सर्व विश्वाला सांगतात. कमलाची कळी उमलूं लागली म्हणजे तिच्यात सांठविलेला सुगंध मावेनासा होऊन ती रावरंकांमध्यें तो सुवास पसरविते, त्याप्रमाणें ते सर्व जगांत माझी कीर्ति पसरवितात, या गुणानुवादाच्या आनंदांत आपणा स्वतःसही विसरतात व या विसरण्यांत शरीर व प्राण विरून जातात. ”



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील.
छबिलदास रोड, दादर (W. R.),

# 'सदा सर्वदा देव सन्निध आहे'

—पु. वा. कुळकर्णी

आमच्या रोजच्या जीवनांत नीतिमत्तेचें महत्त्व फार आहे. आम्ही इतरांशीं वागतांना स्वार्थ गुंडाळून ठेवला पाहिजे. दुसऱ्याच्या संकटप्रसंगीं धांवत जाऊन त्याचा बचाव केला पाहिजे. सर्वांशीं बंधुभावानें वागणें हेंच आपलें नित्याचें धोरण असलें पाहिजे. सद्सद्विवेक बुद्धि नेहमीं जागी ठेऊन तिच्या प्रकाशांत आम्ही वावरलें पाहिजे.

अशा रीतीनें वागणाऱ्यावर देव कां बरें कृपा करणार नाहीं? तुम्ही देवाच्या कृपेला पात्र होऊं इच्छितां का? मग वरील प्रकारच्या दैवी गुणांनीं तुम्ही सालंकृत झालें पाहिजे. अशी माणसें मागील काळांत होतीं तशीच आजही आमच्यांत वावरत आहेत. तीं याच देशाच्या वाट्याला आलीं आहेत असें नाहीं तर युरोप, अमेरिका खंडांतूनही तीं आढळून येतात. धन्य तीं माणसें! तीं माणसें कसलीं? त्यांना देवमाणसें म्हणणें शोभेल.

युरोपमध्यें असा एक देवमाणूस ३।४ वर्षांपूर्वींच होऊन गेला. त्याचें नांव होतें फ्रँक बुचमन. (१८७८ ते १९६२) जगांत सर्वांनी नीति धर्मानें व देवावर श्रद्धा ठेऊन वागावें व आपलें कल्याण करून घ्यावें यासाठीं ते जीवनभर झटले. साऱ्या जगांतून आपल्या संदेशाच्या प्रसारार्थ ते हिंडले फिरले. आपल्या जर्मन अमेरिकन देशांतीलच नव्हे तर जगांतील देशांतील स्त्री–पुरुष त्यांना आपलीं भावंडें वाटत असत.

अशा या थोर माणसाचे अनुभव लाख मोलाचे असतील हें का सांगायला हवें! त्यांनीं आपले कांहीं अनुभव लिहून ठेवले आहेत. आमच्या सहलीलेच्या वाचकांसाठीं त्या विचारांपैकीं किंवा त्यांच्या अनुभवांपैकीं कांहीं नमुन्यादाखल पुढें देण्यांत येत आहेत.

ज्या माणसाच्या हृदयांत परिपूर्ण श्रद्धा आहे व जो नीतिधर्मानें वागणारा आहे अशा माणसाशीं देव बोलूं शकतो. देवाला त्यानें आपल्या सन्निध आणून ठेवलेला असतो. कशाच्या जोरावर? भाव बळावर! जेथें भाव तेथें देव!

मी करीत असलेल्या उद्योगांत मला भरपूर यश मिळावें असें ऐन उमेदींत असतां मला नेहमीं वाटत असे. मन लावून खूप काम करायचें आणि यश मिळवायचें हा होता माझा खाक्या. एकदां माझ्या सहकाऱ्यांशीं माझें बिनसलें. वाटूं लागलें कीं, त्यांचें वागणें चुकीचें आहे आणि मी करतों तेंच बरोबर आहे!, त्यामुळें काय

झालें माहीत आहे ? त्यांच्याबद्दल माझ्या मनांत द्वेष भावना जागी झाली. माझ्या आरोग्यावरही त्या भावनेचा परिणाम होऊं लागला. मी त्यावेळीं अमेरिकेंत होतों. एकाएकीं मनाला उपरती झाली आणि अमेरिकेंतील कामकाज सोडून मी युरोपमध्यें दौरा काढला. मला जग व जगांतील माणसें पहायचीं होतीं.

इंग्लंडमध्यें असतां त्या भागांतील एका खेड्यांतील चर्चमध्यें मी गेलों. खेड्यांतलें चर्च; तेथें प्रार्थनेसाठीं किती लोक जमणार ? होते सतरा अठरा. धर्मोपाध्याय त्यांच्यापुढें बोलत होता. साधेंसुधें बोलणें होतें त्याचें; परंतु त्यावेळीं तें माझ्या अंतःकरणाला जाऊन भिडलें ! ती कांहीं देववाणी नव्हती. परंतु मला ती तशी भासली.

जो ख्राईस्टचा म्हणजे आपण देवाचा म्हणूं या, खराखुरा भक्त किंवा अनुयायी स्वतःला म्हणवितो त्यानें गर्व, अभिमान बाळगतां नये. तो नम्र असावा. त्याच्या मनांत कोणाहीबद्दल द्वेष भावना असूं नये. परंतु त्या चर्चमध्यें प्रवेश करण्यापूर्वी माझ्याठायीं अहंकार वास करीत होता. मी मोठा आणि इतर कःपदार्थ मला वाटत असत. याच्याबद्दल द्वेष, त्याच्याबद्दल द्वेष, असा गोंधळ माजून राहिला होता माझ्या अंतःकरणांत. तें डागाळलेलें, दूषित झालेलें होतें. हा अगदीं खरा प्रकार आहे.

मीं देवाचा हस्तक व्हावें, देवामध्यें व माझ्यामध्यें कांहीं अंतर राहूं नये असें वाटत असल्यास मी देवाची इच्छा तीच माझी इच्छा, या भावनेनें वागलें पाहिजे. माझी इच्छा मी बाजूला गुंडाळून ठेवली पाहिजे. जें करायचें, जो विचार मनांत आणायचा, तो देवाजीचा. त्याचें स्मरण सदैव ठेऊन वागायचें. अगदीं प्रामाणिकपणें. त्यांत कसूर होऊं द्यावयाची नाहीं. तुम्हीं असें वागूं लागलां म्हणजे दुष्ट विचार तुमच्या मनांत येतील कशाला ?

मला त्या चर्चमध्यें जो साक्षात्कार झाला तो या विचारांचा. त्याच विचारांच्या गुंगींत मी शांतपणें एकेक पाऊल टाकीत बाहेर पडलों. देव माझ्या पाठीशीं आहे. माझा प्रत्येक विचार व प्रत्येक कृती तो डोळ्यांत तेल घालून पहात आहे असें मला वाटूं लागलें. झालें. माझ्या अंतःकरणांत क्रांतिकारक कालवाकालव सुरू झाली.

मी अमेरिका सोडली तेव्हां तेथील माझ्या सहा सहकाऱ्यांबद्दल मला द्वेष वाटूं लागला होता. तो द्वेष अंतःकरणांत पेटत ठेऊन मीं बाहेर पडलों होतों.

त्याबद्दल मला पश्चात्ताप झाला. तत्पूर्वी गांधीजींचे चिरंजीव देवदास यांची व माझी भेट होऊन त्यांच्याशीं माझें जें बोलणें झालें त्यांत त्यांनीं आपल्या वडिलांच्या अत्यंत आवडत्या अशा चार चरणांचें एक स्तोत्र मला म्हणून दाखविलें होतें, ते चरण असे :—

When I survey the wonderous Cross
On whicth the Prince of Glory died
My richest gain I count but loss
And pour contempt on all my-pride

मला फार आवडले ते चरण. ते माझ्या हृदयांत मी जतन करून ठेवले आहेत. पश्चात्तापानें माझें मन कावरेंबावरें झालें होतें. अमेरिकेंत ज्या सहकाऱ्यांचा मी द्वेष केला त्यांची क्षमा मागणें हें माझें कर्तव्य आहे, असें मला तीव्रतेनें वाटूं लागलें. त्यांची क्षमा मागणारें एक पत्र खुल्या अंतःकरणानें मा लिहिलें. त्यांत माझ्या अंतःकरणांत घडून आलेला थारेपालट, तो कसा घडून आला, हें लिहून शेवटी लिहिलें होतें कीं, मी तुमच्याबद्दल मनांत द्वेषभावना बाळगली याचें मला दुःख होत आहे. त्याबद्दल कृपावंत होऊन मला क्षमा करा, असें त्यांना विनविलें व गांधीजींचे ते आवडते चार चरणही त्यांच्या मार्गदर्शनासाठी त्यांना पाठवून दिले.

त्याच दिवशीं कोणी एक गृहस्थ आपला एक गहन प्रश्न घेऊन मला भेटायला व सल्ला मागण्यासाठीं आला. मी माझ अंतःकरण त्याच्यापुढें खुलें केलें. माझा गोड अनुभव कथन केला. तेवढें त्याला पुरेसें होतें. त्याच्याहि जीवनांत माझ्याप्रमाणें नंतर थारेपालट घडून आला. प्रत्येक माणसानें अहंकार व द्वेषभावना यांचा त्याग करून अंतरात्म्याचा आवाज ऐकायला तत्पर होऊन राहिलें पाहिजे. म्हणजे तुम्हांला तुमच्या कल्याणाचा मार्ग आपोआप सांपडेल.

फ्रँक बुचमन पुढें म्हणतात, मी भारतांत नऊ वेळां येऊन गेलों आहें. कारण त्या पुण्यभूमीवर माझें प्रेम होतें. १९१५ सालीं गांधीजींची व माझी पहिली भेट झाली. त्यावेळीं त्यांचे कांहीं सहकारीही मला भेटले होते.

त्यानंतर दहा वर्षांनीं मी पुन्हां भारतांत येऊन श्रीनगर येथून कोडाई–कॅनाल येथें आगगाडीनें जात होतों. मध्यंतरीं एका स्टेशनांत माझ्या हातीं एक 'केबल' देण्यांत आली. त्यांत अमेरिकेंत वास्तव्य करून असलेली माझी प्रिय माता इहलोक सोडून गेल्याची बातमी होती. माझ्यावर तिचें व तिच्यावर माझें अपरंपार प्रेम होतें. मी चांगला व सद्वर्तनी व्हावें म्हणून ती बालपणापासून किती तरी झटली. माझी आई! माझ्यासाठीं तिनें कांहीं करायचें बाकी ठेवलें नाहीं. माझ्या अंतःकरणांत श्रद्धेची भावना तिनेंच निर्माण केली. तिच्या अखेरच्या दिवसांत मी तिच्याजवळ नव्हतों. तिच्या सेवेला मी अंतरलों या जाणीवेनें कांहीं वेळ मी बेचैन झालों.

तो रात्रींचा समय होता. आंत बाहेर सर्वत्र काळोख पसरला होता; परंतु माझ्या डब्यांत मला दिव्य प्रकाशाचा भास होत होता. नक्षत्रांत जणू नवा प्रकाशानें उजळलेला दिवस होता. माझ्या आईचें दिव्य स्मरण! ती मला सर्वत्र दिसूं लागली.

माझी माता मला सोडून गेलेली नाहीं. ती माझ्याजवळ आहे. जसा देव माझ्याजवळ आहे, माझ्याकरवीं व्यवहार चालवीत आहे असें निश्चितपणें मला वाटतें. तसेंच मातेचें.


'सदा सर्वदा देव सन्निध आहे.' या भावनेनें तुम्हीं वागूं लागला म्हणजे आपोआप त्याचा प्रकाश, त्याचें मार्गदर्शन तुम्हांला मिळूं लागतें. तुम्हीं प्रामाणिकपणें, अंतःकरणापासून त्याला शरण गेलें पाहिजे.

माणसामाणसांत नव्हे तर राष्ट्राराष्ट्रांतील तंटेभांडणेंहि या मार्गानें गेलें असतां सहज सुटण्याच्या मार्गाला लागतील. माझ्या आयुष्यभर मी याचा अनुभव घेत आलों आहे.

माणसांनीं व राष्ट्रांनीं दुसऱ्याचा पाडाव करण्याची, दुसऱ्याचें जें कांहीं असेल तें गिळंकृत करण्याची, लुबाडण्याची सैतानी वृत्ति सोडून दिली पाहिजे. माणसांचा तसाच राष्ट्रांचा कायापालट झाला पाहिजे. ती काया त्या दैवीशक्तीनें व्यापली गेली पाहिजे. डावीकडे, उजवीकडे कुठेंही पहायचें नाहीं. सरळ पहायचें, त्याचें चिंतन करायचें म्हणजे तो तुमच्या अडीअडचणीच्या प्रसंगीं तुमचें सारथ्य करायला कोणत्या ना कोणत्या रूपानें धांवत आल्याशिवाय रहाणार नाहीं.

देवाचा शब्द मानायला, तो इमानेंइतबारें पाळायला तुम्हीं तयार आहांत का? मग तुमची काळजी वहायला नको. तोच तुमची काळजी वहाणार हें निश्चित आहे.




श्रेष्ठ प्रतीचीं

जी. बी. फाऊंटनपेन

इंक नेहमीं वापरा.

जी. बी. विचारे आणि कं.,

लायब्ररी रोड, दादर-मुंबई २८.

# विनोबांची विचार पोथी

—संत विनोबा

२०६. संतांनीं मोक्षहि तुच्छ केला, त्यांत दोन उद्देश आहेत :
( १ ) मोक्षाची विकृत कल्पना काढून तिला उजाळा द्यावयाचा. आणि
( २ ) साधनेचें गौरव करावयाचें.

२०७. पुराणकारांनीं काल्पनिक देव उभे करून त्यांची स्तुति केली. काल्पनिक राक्षस निर्माण करून त्यांची निंदा केली. अशा रीतीनें मनुष्याचें नांव वगळून 'न म्हणे कोणासी उत्तम वाईट' हें सूत्र सांभाळलें आणि परभारें नीतिबोधाचें कार्य साधलें. हे देव आणि राक्षस आमच्याच हृदयांत राहत आहेत, एवढें आम्हीं ओळखलें पाहिजे.

२०८. एखादा नाटककार जसा स्वतः नाटक रचून त्या नाटकाच्या प्रयोगांत स्वतः सामील होतो, तसें ईश्वराचें आहे. ईश्वर विश्वरूप नाटक रचून त्यांतला आत्म्याचा पार्ट स्वतः करीत असतो. 'तत् सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्।'

२०९. मनुष्य आणि पशु ह्यांच्यांतील मुख्य विशेष वाणीचा आहे. जर पशूच्या ठिकाणीं मनुष्यासारखी वाणी कल्पितां आली तर त्याच क्षणीं त्याच्या ठिकाणीं मनुष्यासारखा विचारहि कल्पितां येईल. म्हणून वाणी पवित्र राखणें हे मनुष्याचें स्वभाविक कर्तव्य आहे.

२१०. वानप्रस्थाश्रम म्हणजे अनुभव, स्थिरवृत्ति आणि इंद्रियनिग्रह.

२११. आत्मप्रयत्न, वृद्धांचा आशीर्वाद, संतांची संगति, गुरुकृपा आणि ईश्वराची इच्छा ही परमार्थाचीं साधकें आहेत.

२१२. ईशाची सत्ता म्हणजे आत्म्याची अमरता, म्हणजे धर्माची नित्यता म्हणजे जीवनाची आनंदमयता.

२१३. 'अर्धोन्मीलित दृष्टि' म्हणजे—

'आंत हरि बाहेर हरि'
'ब्रह्म–कर्म समाधि'
'त्यक्तेन भुञ्जीथाः।'
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'
'जाणोनि नेणते करीं माझें मन।'
'संत हंस गुन गहहिं पय,
परिहरि बारि विकार॥'
'स्याद् वा न स्याद् वा।'
'अद्वैत–भक्ति'

२१४. प्रार्थनेंत डोळे मिटावे तर झोंप लागते, उघडावे तर एकाग्रता बिघडते. म्हणून अर्धोन्मीलित दृष्टि राखावी.

२१५. घराला आग लागली आहे आणि लोक काय म्हणतील म्हणून ओरड करीत नाहीं. त्याला तरी लोक काय म्हणतील?

२१६. व्यासांनीं विष्णुसहस्रनाम लिहिलें. त्यांत आधीं ॐ काराचा उच्चार केला आहे. ॐ हें विष्णुसहस्रनामाचें अतिसंक्षेपरूप आहे.

२१७. 'अहम्' ही आत्म्याची खूण आहे.

'अ–हं' म्हणजे 'न हन्यते' असा मी अर्थ करतों.

२१८. मुक्त रामांत मरतात. मुमुक्षु रामांत रमतात.

मुमुक्षूंच्या ह्या रामनामाला 'उलटा जप' म्हणतात.

२१९. मनुष्य जागून थकला म्हणजे निजतो, आणि निजून थकला म्हणजे जागतो. रजस् आणि तमस हीं एकमेकांचीं प्रति–फलितें आहेत.

२२०. गायत्रीमंत्र व्यक्तिगत उपासनेचा मानलेला आहे. पण 'धीमहि'– आम्ही ध्यान करतों–हें बहुवचनी पद समुदायाचें सूचक आहे. म्हणजे गायत्री–उपासना व्यक्तीनें करावयाची आहे, पण ती आपल्या ठिकाणीं सर्व समुदायाची–विश्वात्म्याची कल्पना करून करावयाची आहे.

२२१. पाश्चात्य भाषांत 'संतांचें अनुवर्तन' असा प्रयोग आढळून येतो. आपल्या इकडे 'संतांचें गुणगान' म्हणतात. 'गुणगान' म्हणण्यांत नम्रता आहे, पण त्यांत 'अनुवर्तन' गृहीत असेल तरच ती नम्रता शोभेल.

२२२. ईश्वर आदर्शमूर्ति, ध्येय, ज्ञेय, अनुकरणीय.

२२३. आमच्यापाशीं पांच इंद्रियें असल्यामुळें 'आमच्या' जगांत पांच विषय आहेत. वास्तविक, जगांत अनंत विषय आहेत, अथवा मुळींच नाहींत.

२२४. 'कला म्हणजे काय' असा प्रश्न विचारला जातो. वास्तविक, कला कोणाची किंवा कशाची असा प्रश्न विचारला पाहिजे. उत्तर—'आत्म्याची' अर्थात् अमर, अर्थात् अतीन्द्रिय पण बुद्धिग्राह्य. बुद्धीच्या पलीकडे अकल आत्मा. कृति कला नसते. कृतींत कला असते अथवा नसते. मारुति जेव्हां एकेक मोती फोडून त्यांत 'राम' दिसतो का म्हणून पाहत होता, तेव्हां तो त्यांत आत्म्याची 'कला' दिसते का म्हणून पाहात होता.

२२५. सात्त्विकता दोन प्रकारची असते : कर्तरि आणि कर्मणि. कर्तरि म्हणजे आपला जोर चालविणारी. कर्मणि म्हणजे प्रवाहांत वाहणारी. कर्तरी सात्त्विकता परमार्थोपयोगी आहे. कर्मणि सात्त्विकता संसार बरा करते.

२२६. "आत्मा कशानें सिद्ध होतो?"

ह्या तुझ्या प्रश्नानें सिद्ध होतो.

म्हणजे हें उत्तर तुला पटलें, तर त्या पटण्यानें सिद्ध होतो.

२२७. सात प्रमाणें :—

(१) कालात्मा (२) स्व-बुद्धि (३) अक्षिपुरुष (४) सूर्यनारायण (५) शब्दब्रह्म (६) सत्यधर्म आणि (७) परमेश्वर. ह्याचे स्पष्टार्थ—

(१) काल अनंत आहे हें विसरूं नये.

(२) आपली बुद्धि सांगेल त्याप्रमाणें करावें.

(३) प्रत्यक्ष कृतींत उतरेपर्यंत प्रयत्न सोडूं नये.

(४) मन मोकळें करावें.

(५) संतांचीं वचनें घोकावीं.

(६) सत्य आचरण्याचा प्रयत्न करावा.

(७) ईश्वराची करुणा भाकावी.

२२८. सत्संगति हें माझ्या सर्व साधनेचें मूळ आहे. तत्त्वनिष्ठा विरुद्ध सत्संगति असा प्रश्न उत्पन्न झाला—जें अशक्य आहे, तर तत्त्वनिष्ठा सोडूनहि सत्संगति पत्करण्याकडे मनाचा कल व्हावा इतकी सत्संगतीविषयीं आसक्ति वाटते.

२२९. कोणी म्हणतात, 'ईश्वर अज्ञेय आहे.' जर अज्ञेय, तर आहे कशावरून? जर आहे, तर अज्ञेय कसा?

२३०. कर्म ज्ञानाचें पेटवण आहे. ज्ञानाग्नि अखंड पेटत ठेवण्यास कर्मरूप पेटवण अखंड पुरवलें पाहिजे.

२३१. आमचें शब्दप्रामाण्य म्हणजे ऋषींचें प्रत्यक्ष. म्हणून शब्दप्रमाणहि अनुभवाच्या कसाला लावून पाहणें योग्य आहे.

२३२. सत्य—धर्म—ब्रह्म.

२३३. 'न तद् भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः'

सूर्य—प्रत्यक्ष (चक्षुः)

शशांक—अनुमान (मनः)

पावक—शब्द (वाक्)

२३४. आत्मदर्शन हें जीवनांतलें काव्य होय.

२३५. फळ तुला आधींच मिळून चुकलें आहे. आतां कर्तव्य करण्याचें बाकी उरलें आहे. पुन्हां फळ कसलें मागतोस?

२३६. विश्व—प्रत्यक्ष—ब्रह्म.

ईश्वर—अनुमान—ब्रह्म.

वेद—शब्द—ब्रह्म.

आत्मा—ब्रह्म.

२७३. अ—पासून ज्ञ—पर्यंत सर्व अक्षरें ब्रह्माचीं प्रतीकें आहेत. पण 'अ' आणि 'ज्ञ' ह्या विभूति आहेत. 'ब्रह्म अ—ज्ञ आहे' अशी उपासना करावी. ह्या उपासनेनें भक्त नम्र होईल.

(१) अ-ज्ञ म्हणजे अनासक्त ज्ञान. (२) अ-ज्ञ म्हणजे वाङ्मयमूर्ति. (३) अ-ज्ञ म्हणजे निर्गुण आणि सगुण दोन्ही. (४) अ-ज्ञ म्हणजे नेणता. हा तर अर्थ प्रसिद्धच आहे.

२३८. अपरिग्रहाची कातरी ज्ञानालाहि लावली पाहिजे. व्यर्थ भाराभर ज्ञानाचा परिग्रह करणें योग्य नाहीं.

२३९. आत्मा शक्यता–मूर्ति आहे. आत्म्याला अशक्य असें कांहीं नाहीं.

२४०. 'सायन्स'ची कितीहि सूक्ष्म दुर्बीण घेतली तरी आत्म्याचा आवाज ऐकण्याच्या कामीं ती निरुपयोगी आहे.

२४१. पहिलें मंगल कोणतें ?–भगवान् विष्णुः
दुसरें मंगल ?–गरुडध्वजः
तिसरें मंगल ?–पुण्डरीकाक्षः
चवथें मंगल ?–विष्णुसहस्रनाम पहा.

२४२. तप आणि ताप ह्यांतील विभाजक रेषा ओळखणें जरूर आहे.

२४३. अखंड ईश्वरस्मरण म्हणजे अखंड कर्तव्यजागृति.

२४४. ईश्वरशरणतेची मूर्ति फलत्याग.

२४५. मी असें पाहतों कीं माझी देवाविषयीं जितकी भक्ति, त्यापेक्षां देवाची माझ्यावर कृपा अधिक आहे.

२४६. अभ्यास आणि वैराग्य हीं एकाच वस्तूचीं विधायक आणि निषेधक अंगें आहेत.

२४७. पहिलें दर्शन–नृसिंह देव.
दुसरें दर्शन—नृसिंह, प्रल्हाद दोघे देव.
तिसरें दर्शन—नृसिंह, प्रल्हाद, हिरण्यकशिपु तिघे देव.
चवथें दर्शन—नृसिंह, प्रल्हाद, हिरण्यकशिपु तिघांच्याहि पलीकडे देव.

२४८. मला स्वधर्मच आचरणीय कां ?
ममतेमुळें नव्हे किंवा परधर्माहून तो श्रेष्ठ म्हणूनहि नव्हे, तर माझा त्यांतच विकास आहे म्हणून.

२४९. गुण किंवा दोष 'सहकुटुंब सहपरिवार येऊन कार्यसिद्धि' करीत असतात.

२५०. सुताराला ज्याप्रमाणें भूमितीच्या सिधान्तांची निष्ठा वाटते. तसें सेवकाला अहिंसादि व्रतांची निष्ठा वाटावी.

२५१. कमींत कमी परिग्रहांतून जास्तींत जास्त कस कसा काढावा हें अपरिग्रह

२५२. श्रद्धा + प्रज्ञा + वीर्य = सत्व.

२५३. कल्याण सार्वजनिक आहे. तें व्यक्तीचें राखीव असूं शकत नाहीं.

२५४. आधीं प्रेम, मग त्याग शेवटीं शांति.




## मे १९६६

या महिन्यांत श्रीसाईबाबांचे दर्शनासाठीं बाहेरगांवची भक्तमंडळी सुट्टीमुळें कुटुंबांतील मुलाबाळांसह पुष्कळच आली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीचे समाधीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

### कीर्तन

श्री. ह. भ. प. मोरेश्वर नरहर धुळेकर, भुसावळ.

श्री. ह भ. प. हरी वासुदेव ओक, काकडतळें महाड, जि. कुलाबा.

श्री. ह. भ. प. नामदेवबुवा गंगाराम नरसुले, मुंबई.

गवई श्री. मराठे यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें.

### गायन

श्री. किसन सावंत ( भावगीत रेडिओ स्टार ) ग्रँट रोड, मुंबई.

श्री. रामचंद्र महादेव करंदीकर उर्फ रामकरंदीकर, अंधेरी, मुंबई ५८.

श्री. गुलाबराव बाबाराव ठाकरे मु. भांडुप मुंबई ७८

### नृत्य

श्री. गजानन पार्टी ( कोळी नृत्य ) चालक सौ. मथुराबाई शिवराम धरणकर, कुलाबा, मुंबई नं. ५.

### सूर्यग्रहण

दि. २०।५।६६ शुक्रवार रोजी दुपारी ४ वाजल्यापासून सायंकाळी ५॥ वाजेपर्यंत साईसंस्थानतर्फे श्रींचे पादुकास अभिषेक व नंतर मंगलस्नान असा कार्यक्रम झाला.

### मोठ्यांच्या भेटी

मे. हरिभाऊ पाटसकर, न्यू दिल्ली

मे. आर. डी. निगुडकर, सॉलिसिटर जे. पी. जॉ. से.
ग. ऑफ महाराष्ट्र

मे. कुलकर्णी, सेक्रेटरी एम्. आय. डी. सी. मुंबई

मे. दिनशा जे. मिस्त्री, सॉलीसीटर, मुंबई

डॉ. डी. व्ही. पंड्या, डेप्युटी मिनिस्टर एज्युकेशन डिव्हीजन [ गुजराथ ]

नामदार नरेंद्र तिडके, मजुरमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई

मे. एम्. बी. पालेकर, इन्कमटॅक्स कमिशनर, मुंबई

मे. जे. डी. ओझा, अंडर सेक्रेटरी रेव्हेन्यू डिपार्टमेंट [ गुजराथ राज्य ]

मे. डी. बी. सूर्यवंशी, ॲडिशनल डि. ॲघसेशन जज्ज इंदोर, म. प्रा.

मे. डी. जी. तुंगारे, डे. से. फायनान्स डि. सचिवालय, मुंबई

मे. काळकर, डी. आय. एल. आर., नाशिक

मे. एम्. एम्. मांडवीवाला, सुपरिंटेंडेंट से. एक्साईज, बडोदा

मे. एम्. एस. पाटील, रिटायर्ड डी. जज्ज, हुकेरी

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २.

टे. नं. २२८५५

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण.

होलसेल व रीटेलर्स

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १–०० |
| (७) **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १–०० |
| (८) श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१५) कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१६) शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१७) श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१८) **Guide to Shirdi** (English) | | | ००–१२ |
| (१९) स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | |
|---|---|
| (1) Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | **00-37** |
| (2) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

Regd. No. M. H. 527




★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.